मूळ संस्कृत श्लोकांसह

मराठी अनुवाद

श्रीपाद काळे

ऋग्वेद

भाग १६



पंचम मंडलम्

द्वितीय खंड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १६

पंचम मंडलम्

द्वितीय खंड

सूक्त २३ ते ४४

मूळ संस्कृत + मराठी

मराठी अनुवाद – **श्री. श्रीपाद काळे**

सहाय्य- **डॉ. हेमंत विंझे**

सौ. आशा कऱ्हाडे

॥ऋग्वेद संहिता॥

भाग १६

पंचम मंडलम् (द्वितीय खंड)

सूक्त २३ ते ४४

लेखक: श्री. श्रीपाद काळे

भ्रमण ध्वनि नंबर 9869447431

ईमेल shripadykale@ gmail.com

सहाय्य-

डॉ. हेमंत विंझे -drvinze@gmail.com

सौ. आशा कऱ्हाडे- ashakarhade@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २९ जुलै २०२६ (गुरुपोर्णिमा)

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादक टीम परिचय

प्रा. श्रीपाद काळे, मुंबईतील विल्सन महाविद्यालयात १९७७ सालापासून फिजिक्स विषय शिकवत होते. २००८ सेवा निवृत्ती स्वीकारून मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात स्वेच्छेने अनेक लोकोपयोगी कामे करत आहेत. नोकरीच्या काळामध्ये शिक्षकांना सेवा प्रशिक्षण, ऑलंपियाड सारख्या परीक्षांचे आयोजन करत होते. विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स विषयाची गोडी लावण्यासाठी प्रयोग केले.

डॉ. हेमंत विंझे अनेक वर्षे सर्जन म्हणून कार्यरत होते. विज्ञानावरील त्यांच्या पुस्तकांना राष्ट्रीय पारितोषिके मिळाली आहेत. त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यांना बेस्ट सिटीजन ऑफ इंडिया हे इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस यांचे पारितोषिक सुद्धा मिळाले आहे.

सौ. आशा गोपाळकृष्ण कऱ्हाडे. (एम्. ए. संस्कृत.)आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयासाठी मार्गदर्शन.Karhade channel या you tubeचॅनल वर रामरक्षा, अथर्वशीर्ष, विष्णु सहस्रनाम अशा अनेक सुप्रसिद्ध स्तोत्रांवर निरुपण केलेले आहे.

पहिल्या मंडलाचे मनोगत

मी प्रा. श्रीपाद काळे आणि माझे स्नेही डॉ. हेमंत विंझे ह्यांच्यामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. चर्चेमध्ये आमच्या निदर्शनास आले की वेदांचे मराठीत अनुवाद इंटरनेटच्या जंजाळात नाही. निदान आम्हा दोघांना तरी ते सापडले नाही. काही मराठी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरुपरंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. ऋग्वेद संहितेच्या २१ शाखा असल्याचा उल्लेख पतञ्जलीने आपल्या व्याकरण महाभाष्यात केला आहे. त्यामध्ये "अश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व “शांखायन” अशा ऋषींनी केलेल्या श्लोकांच्या मांडण्या प्रसिद्ध होत्या. परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे. आज आपण ज्या ऋग्वेदाचे पठण करतो ते शाकलऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहे. शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला “शाकल संहिता” असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडल असे म्हणतात. प्रत्येक मंडलामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले. प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात. सर्व ऋचा या पद्य स्वरूपात आहेत. शाकल ऋषींनी तयार केलेल्या संहिते मध्ये १० मंडले, १०२८ सूक्ते,१०५५२ ऋचा आहेत.

१ जानेवारी २०२५ पासून मी आणि माझे स्नेही ह्यांनी आम्हाला कळेल असे ऋग्वेदातील ऋचांचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला इंटरनेटच्या जगात इंग्रजी आणि हिंदी भाषांतरे मिळाली. मराठी अनुवाद कुठेही मिळत नव्हते. निदान आम्हाला तरी सापडले नाही. अचानक सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भाषांतरित केलेल्या पुस्तकाची माहिती

मिळाली. अनेक प्रयत्नानंतर १९९६ सालची दुर्मीळ आवृत्ती आम्हाला मिळाली. ऋचांचे अनुवाद करताना आम्ही हिंदीतील डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा, हिंदी ऋग्वेद संहिता सनातन, इंग्रजीतील डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी आणि मराठीतील सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी केलेल्या अनुवादाचा संदर्भ वापरला आहे. सर्व अनुवाद वाचून आम्हा दोघांना जसा अर्थ कळला त्याप्रमाणे सर्वांना कळेल असे ऋचांचे भाषांतर आम्ही करत आहो. काही ऋचांचा अर्थ लावताना आम्हाला खूप वेळ लागला आणि कष्ट करावे लागले. प्रत्येक महिन्यात निदान १५ सूक्ते भाषांतर करावी असा आम्ही संकल्प केला आहे. अनुवाद क्लिष्ट होऊ नये म्हणून आम्ही पाठभेदान्चे विश्लेषण करणे टाळले आहे. एकच पाठ प्रमाण मानला आहे. वाचकाने गैरसमज करून घेऊ नये.

आम्ही केलेला अनुवाद हा लोकांपर्यंत कसा पोहोचवा याच्या विवंचनेत आम्ही दोघंही होतो. त्याच वेळेस लोकांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी भरीव कामगिरी करणाऱ्या ईसाहित्य प्रतिष्ठानची आठवण झाली.

ई साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री सुनीळ सामंत ह्यांनी आम्ही केलेल्या पंधरा सुक्ताचा अनुवाद वाचून आम्हाला अनुवाद करण्यास प्रोत्साहन दिले. हा अनुवाद पुस्तक रुपात लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी श्री सुनीळ सामंत यांनी घेतली.

हा अनुवाद बिनचूक होण्यासाठी सौ आशा कऱ्हाडे यांनी प्रत्येक संस्कृत श्लोक वाचून मराठी व्याकरण आणि अर्थ नीट तपासून पहिला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ऋचांमध्ये सुधारणा करून हा अनुवाद आम्ही तिघेही सादर करत आहोत. हा अनुवाद सगळ्यांना आवडेल आशा आम्ही करतो. तरीही काही त्रुटी आढळल्यास निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

श्रीपाद काळे

मनोगत

रविवार दिनांक ३० मार्च २०२५ चैत्र पाडव्यापासून ऋग्वेदातील पहिला भाग ई साहित्य प्रतिष्ठान ह्यांनी प्रकाशित केला. त्यानंतर गेल्या वर्ष अखेरी ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १९१ सूक्ते आणि त्यातील २००६ ऋचाचा अनुवाद ई साहित्य प्रतिष्ठान यांनी ९ भागात प्रकाशित केला. पहिल्या भागातील सर्व १९१ सूक्त एकत्र घेऊन संपूर्ण पहिले मंडल सुद्धा ई साहित्य प्रतिष्ठानी प्रकाशित केले.

पहिले मंडल प्रकाशित करताना अनेक वाचकांनी अमूल्य अभिप्राय कळवला. त्यामुळे पुढील मंडल अनुवादित करण्यास ऊर्जा मिळत आहे

जानेवारी २०२६ पासून दुसऱ्या व तिसऱ्या मंड्लाचे काम पूर्ण केले. ही सर्व सूक्त एकच भागात प्रकाशित करत आहोत.

मे महिन्या पासून चवथे मंडल दोन भागात प्रकाशित करण्याचा संकल्प केला आहे. त्यातील हा पहिला भाग आहे.

श्रीपाद काळे

अनुवाद : श्री.श्रीपाद काळे,

सहाय्य- डॉ. हेमंत विंझे आणि सौ. आशा कऱ्हाडे

संदर्भ : डॉक्टर श्री. गंगा सहाय शर्मा,
डॉक्टर श्री.भीमराव सदाशिव कुलकर्णी,
हिंदी ऋग्वेद संहिता सनातन.
ऋग्वेदाचे मराठी भाषांतर डॉक्टर सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

ऋग्वेदा बद्दल काही उपयुक्त माहिती

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक असून त्याची रचना चार वेदांमध्ये सर्वप्रथम झाली आहे असे समजण्यात येते.

ऋग्वेद संस्कृत वाङ्मयातील पहिला ग्रंथ आहे. प्राचीन काळापासून ऋग्वेद हा मौखिक स्वरूपात होता. अनेक ऋषींनी वेगवेगळे श्लोक लिहिले. हे श्लोक वेगवेगळ्या देवांसाठी लिहिले. गुरु परंपरेनुसार हे श्लोक अनेकांनी पाठ केले. या सर्व श्लोकांची काही जणांनी नीट मांडणी केली. त्यामध्ये "आश्वलायन", "बाष्कल", "मांडूकेय", "शाकल" व शांखायन सारख्या ऋषींनी श्लोकांची मांडणी केली परंतु काळाच्या ओघात फक्त शाकल ऋषींनी केलेली वर्गवारी शिल्लक राहिली आहे आपण ज्या ऋग्वेद पठण करतो ते शाकल ऋषींनी मांडणी केलेले श्लोक आहेत शाकल ऋषींनी केलेल्या मांडणीला शाकल संहिता असे संबोधले जाते

शाकल ऋषींनी महत्त्वाचे श्लोक वेगवेगळ्या क्रमवारीने लावले आणि त्यांचे विभाग पाडले. या विभागांना मंडळ असे म्हणतात. शाकल ऋषींनी श्लोकाची विभागणी केली त्याला मंडळ म्हणतात. मंडळातील प्रत्येक मंडळामध्ये ऋषी आणि देवता यांच्याप्रमाणे उपविभाग केले . प्रत्येक उपविभागाला सूक्त म्हणतात. सूक्तातील श्लोकांना ऋचा म्हणतात . सर्व ऋचा या पद्य स्वरूपाच्या आहेत. शक्कल ऋषींनी तयार केलेल्या ऋग्वेदात १० मंडले, १०२८ सूक्ते, १०५५२ ऋचा आहेत.

श्रीपाद काळे

पंचम मंडलाविषयी

ऋग्वेदाचे पाचवे मंडळ प्रामुख्याने 'अत्री मंडळ' म्हणून ओळखले जाते.

या मंडळाची मराठीत थोडक्यात आणि महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एकूण सूक्ते: या मंडळात ८७ सूक्ते (स्तोत्रे) समाविष्ट आहेत. त्यामुळे याचे आपण चार भाग करणार आहोत प्रत्येक भागात २२ सूक्त असतील पाचव्या महिन्यातला पहिला भाग पाठवत आहे

या मंडळातील बहुतांश सूक्तांची रचना महर्षी अत्री आणि त्यांच्या वंशजांनी (उदा. श्यावाश्व, गविष्ठिर, भौम अत्री) केली आहे. त्यामुळे याला 'अत्री मंडळ' म्हणतात

सूर्यग्रहण कथा (सूक्त ५.४०): या मंडळातील ४० व्या सूक्तामध्ये एका ऐतिहासिक खगोलीय घटनेचा उल्लेख येतो. जेव्हा राहु आणि असुर स्वरभानूने सूर्याला आपल्या अंधाराने झाकले (सूर्यग्रहण झाले), तेव्हा महर्षी अत्री यांनी आपल्या मंत्रशक्तीने आणि प्रार्थनेने सूर्याला पुन्हा प्रकाशमान केले, अशी कथा यात आढळते.

श्रीपाद काळे

ऋग्वेदामध्ये अनेक वेळा एकवीस रत्नांचा उल्लेख येतो. आमच्या ऋग्वेदाचा भाग दोन या मधील सूक्त वीस ऋचा सात त्याच्यामध्ये ही एकवीस रत्ने असा उल्लेख. त्याचे स्पष्टीकरण

ऋभूंनी आम्हाला एकवीस रत्ने (श्रेष्ठ वस्तू) द्याव्या. सायणाचार्यांच्या मतानुसार ही एकवीस रत्ने म्हणजे एकवीस यज्ञ होत.

यज्ञाचे मुख्य दोन प्रकार आहेत. श्रौत यज्ञ आणि गृह्य किंवा पाक यज्ञ. श्रौत यज्ञाचे पुन्हा दोन प्रकार आहेत हविर्यज्ञ आणि सोम यज्ञ. या तीनही प्रकारच्या यज्ञांना संस्था (form) म्हणतात. आणि त्यांचे प्रत्येकी सात प्रकार मानले आहेत. म्हणून एकूण एकवीस प्रकार होतात.

हविस्संस्था - अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, निरूढपशुबन्ध, सौत्रामणि

सोम संस्था - अग्निष्टोम, उक्त, षोडशी, अत्यग्निष्टोम, अतिरात्र, अप्तोर्याम, वाजपेय

गृह्य किंवा पाक संस्था - हुतं, अहुत, प्राशित, संस्कार, शूलगव, अष्टका, प्रत्यवरोहण

श्रीपाद काळे

आशिर्वाद



पब्लिक ट्रस्ट रजि. नं. : ए - १३११

ॐ

श्री स्वामी जगद्गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

श्री प. प. विद्यानृसिंह भारती स्वामी (एकमेव विश्वस्त)

२२११, डी वॉर्ड, शुक्रवार पेठ, कोल्हापूर ४१६ ००२, फोन नं. : २५४१५५४/२५४०३६२.
E-mail : peethkarvir@gmail.com | Website : www.shankaracharyakarveer.org

विश्वावसु शके १९४७
आषाढ शुद्ध सोमवार
दि. ७/७/२०२५

श्री. डॉ. विंझे हेमंत लक्ष्मण
मुंबई.
मो. 7678091629

पीठस्थ देवतेचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण.

आपण ऋग्वेदाचे भाषांतर करत आहात तेही या वयात, हीच खरी कौतुकास्पद बाब आहे. आम्हाला याचा आनंद तर आहेच शिवाय स्फुरणही आहे.

खरे तर आपण ऑर्थोपेडिक सर्जन. अनेकांची ऑपरेशन करत आपण त्या त्या लोकांना आरोग्य प्राप्त करून दिले. व त्या सर्वांच्या सदिच्छा घेतल्या. वृद्धांचे आशीर्वादही घेतले. परिणाम असा झाला की व्यावहारिक निवृत्तीनंतरही आपण आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात सत्कार्य म्हणजे वेदाचे भाषांतर करण्यास लागला. खरं तर ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. हे आपण अंगीकृत केलेले व्रत आपणास आनंदाच्या शिखरावर घेऊन जाईल. व संतांच्या भाषेतील आध्यात्मिक सुख आपणास प्राप्त होईल.

यापूर्वी सुद्धा असाच प्रयत्न सुमारे ६० वर्षांपूर्वी कुर्तकोटी यांनी यशस्वी केला. व ऋग यजु. साम वेदांचे भाषांतर करून ते आमच्या प्रेस आले असेही ऐका ५ तास बसून (वय ८८ वर्षे) ते अथर्ववेदाचे भाषांतर करत होते असो. कदाचित ही कांही गडबड असेल पण आपलीही काही कमी नाही.

आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो हीच पीठस्थ देवतेच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा पीठस्थ देवतेचे अनेक आशीर्वाद व आमचे नारायण-स्मरण सर्वांस विदित व्हावे.

महानुशासनम् वर्तते
श्री जगद्गुरु शंकराचार्य
करवीर पीठ
कोल्हापूर

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२३

ऋषि- - द्युम्न विश्वचर्षणि आत्रेय **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप् ४ पंक्ति

द्युम्न विश्वचर्षणि : आपल्या दिव्य ज्ञान-प्रकाशाने संपूर्ण विश्वाला सन्मार्ग दाखवणारे ऋषि

अग्ने सहन्तमा भर द्युम्नस्य प्रासहा रयिम् ।

विश्वा यश्चर्षणीरभ्यासा वाजेषु सासहत्॥१॥

द्युम्न ऋषि म्हणतात," अत्यंत शक्तिशाली अग्निदेवा ! आपल्या सामर्थ्याने शत्रूंचा पराभव करणारे सामर्थ्य आणि उत्कृष्ट तेज देणारे ऐश्वर्य आम्हाला प्राप्त करून द्यावे ही विनंती, जे ऐश्वर्य युद्धाच्या वेळी किंवा जीवनातील संघर्षात सर्व शत्रूंवर विजय मिळवून देईल"॥१॥

तमग्ने पृतनाषहं रयिं सहस्व आ भर ।

त्वं हि सत्यो अद्भुतो दाता वाजस्य गोमतः॥२॥

हे बलशाली अग्निदेवा !आपण शत्रुसैन्याचा पराभव करू शकणारे ऐश्वर्य आम्हाला प्रदान करावे ही विनंती, कारण आपणच सत्यस्वरूप आणि विस्मयकारक असून, आम्हाला गायींनी (पशूधनाने) युक्त असे अन्न व समृद्धी देणारे आहात.॥२॥

विश्वे हि त्वा सजोषसो जनासो वृक्तबर्हिषः ।

होतारं सद्मसु प्रियं व्यन्ति वार्या पुरु॥३॥

हे अग्निदेवा ! जे एकाच विचाराने आनंदी असतात आणि ज्यांनी यज्ञामध्ये पवित्र दर्भासन अंथरलेले आहे असे यज्ञकर्ते भक्तगण यज्ञवेदीमध्ये सर्वांना प्रिय असलेल्या आपल्या कडून विपुल आणि श्रेष्ठ धनाची मागणी करतात.॥३॥

स हि ष्मा विश्वचर्षणिरभिमाति सहो दधे ।

अग्न एषु क्षयेष्वा रेवन्नः शुक्र दीदिहि द्युमत्पावक दीदिहि॥४॥

अग्निदेव खरोखरच सर्व मानवांचे रक्षण करणारे आणि सर्वांवर लक्ष ठेवणारे आहेत आणि आक्रमण करणाऱ्या शत्रूंचे बल नष्ट करण्यासाठी स्वतः सामर्थ्य धारण करतात. हे अत्यंत पवित्र आणि तेजस्वी अग्निदेवा! आपण धनाने व ऐश्वर्याने युक्त होऊन आमच्या या घरांमध्ये दिव्य प्रकाशाने निरंतर चमकत राहावे ही विनंती. ॥४॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२४

ऋषि- - बन्धु, सुबन्धु, श्रुतबन्धु आणि विप्रबन्धु (गोपायन किंवा लौपायन)

देवता – अग्नि **छन्द** द्विपदा विराट् (किंवा अनुष्टुप्)

अग्ने त्वं नो अन्तम उत त्राता शिवो भवा वरूथ्यः ॥१॥

हे अग्निदेवा! आपण आमचे सर्वात जवळचे सखा, रक्षक, शुभ चिंतक आहात. आपण आम्हाला सर्व संकटांपासून आश्रय देणारे व्हावे ही विनंती ॥१॥

वसुरग्निर्वसुश्रवा अच्छा नक्षि द्युमत्तमं रयिं दाः॥२॥

हे सर्वांना निवास देणाऱ्या, दिव्य कीर्ती असणाऱ्या अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांजवळ यावे. आम्हाला अत्यंत तेजस्वी, श्रेष्ठ अशी धन-संपत्ती प्रदान करावी ही विनंती.॥२॥

स नो बोधि श्रुधी हवमुरुष्या णो अघायतः समस्मात्॥३॥

हे अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे आवाहन श्रवण करून आमचे रक्षण करावे आणि सर्व प्रकारच्या पापी लोकांपासून आमचा बचाव करावा ही विनंती॥३॥

तं त्वा शोचिष्ठ दीदिवः सुम्नाय नूनमीमहे सखिभ्यः॥४॥

हे अत्यंत तेजस्वी, दिव्य प्रकाश पसरवणाऱ्या अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आमच्या मित्र, सगेसोयरे आणि संपूर्ण विश्वाच्या सुखासाठी आपली प्रार्थना करत आहोत. ॥४॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२५

ऋषि- - वसूयव आत्रेयः **देवता** – अग्नि **छन्द** अनुष्टुप्

अच्छा वो अग्निमवसे देवं गासि स नो वसुः ।

रासत्पुत्र ऋषूणामृतावा पर्षति द्विषः॥१॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो! स्वतःच्या रक्षणासाठी आणि कल्याणासाठी त्या प्रकाशमान अग्निदेवांच्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करावे. अग्निदेव आश्रय आणि सर्व प्रकारची समृद्धी देणारे आहेत. उत्तम दानाने युक्त आणि सत्याचे पालन करणारे अग्निदेव ऋषींच्या सर्व संकटांचे निवारण करतात, द्वेष करणाऱ्या शत्रूंपासून तारून नेतात॥१॥ .

स हि सत्यो यं पूर्वे चिद्देवासश्चिद्यमीधिरे ।

होतारं मन्द्रजिह्वमित्सुदीतिभिर्विभावसुम् ॥२॥

ज्याला प्राचीन काळातील देवांनी आणि ऋषींनी प्रदीप्त केले होते असे अग्निदेवच परम सत्य आहेत. अग्निदेव यज्ञामध्ये आहुती स्वीकारणारे, मधुर ज्वाळांनी युक्त असलेल्या आणि आपल्या दैदिप्यमान प्रकाशाने सर्वांना प्रकाशित करणारे आहेत.॥२॥

स नो धीती वरिष्ठया श्रेष्ठया च सुमत्या ।

अग्ने रायो दिदीहि नः सुवृक्तिभिर्वरेण्य॥३॥

हे परम पूजनीय आणि श्रेष्ठ अग्निदेवा ! आपण आपल्या अत्यंत उत्कृष्ट बुद्धीने आणि कल्याणकारी सद्बुद्धीने आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर अनुग्रह करावा ही विनंती. आमच्या पवित्र स्तुतींवर प्रसन्न होऊन आपण आम्हांला श्रेष्ठ आणि दिव्यधन प्रदान करावे ही विनंती॥३॥

अग्निर्देवेषु राजत्यग्निर्मर्तेष्वाविशन् ।

अग्निर्नो हव्यवाहनोऽग्निं धीभिः सपर्यत॥४॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! जे अग्निदेव देवतांमध्ये सर्वश्रेष्ठ देव म्हणून चमकतात, जे भक्तगणांच्या घरामध्ये निवास करतात, जे यज्ञातील हविष्यान्नाची आहुती देवांपर्यंत पोहोचवतात त्या अग्निदेवांची तुम्ही पवित्र बुद्धीने सेवा व उपासना करावी.॥४॥

अग्निस्तुविश्रवस्तमं तुविब्रह्माणमुत्तमम् ।

अतूर्तं श्रावयत्पतिं पुत्रं ददाति दाशुषे ॥५॥

यज्ञकर्त्या आणि हविष्यान्नाची आहुती देणाऱ्या भक्तगणांना अग्निदेव असा पुत्र प्रदान करतो, जो अत्यंत कीर्तीमान, वेदांचा ज्ञाता, श्रेष्ठ, कोणाकडूनही पराभूत न होणारा आणि कुटुंबाचे नाव उज्ज्वल करणारा असेल. ॥५॥

अग्निर्ददाति सत्पतिं सासाह यो युधा नृभिः ।

अग्निरत्यं रघुष्यदं जेतारमपराजितम्॥६॥

हे अग्निदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना सज्जनांचे रक्षण करणारा, आपल्या सैनिकांसह युद्धात शत्रूंवर विजय मिळवणारा, कधीही पराभूत न होणारा, अतिशय वेगवान पुत्र आम्हाला प्रदान करावा ही विनंती .॥६॥

यद्वाहिष्ठं तदग्नये बृहदर्च विभावसो ।

महिषीव त्वद्रयिस्त्वद्वाजा उदीरते॥७॥

हे प्रकाशमान अग्निदेवा ! आपण हविष्यान्नाची आहुती देवांपर्यंत अत्यंत वेगाने पोहोचवणारे आहात म्हणून आपल्यासाठी आम्ही यज्ञकर्ते भक्तगण हे महान आणि श्रेष्ठ स्तोत्र पठण करत आहोत. एखाद्या पट्टराणी राणीप्रमाणे (महिषी:) आपल्यापासूनच सर्व प्रकारचे ऐश्वर्य, अन्न आणि पराक्रम उत्पन्न होतात. ॥७॥

तव द्युमन्तो अर्चयो ग्रावेवोच्यते बृहत् ।

उतो ते तन्यतुर्यथा स्वानो अर्त त्मना दिवः॥८॥

हे अग्नीदेवा ! आपल्या तेजस्वी ज्वाळा सोमवृक्षाला चिरडणाऱ्या पाषाणासारख्या दृढ आणि महान आहेत. आपण स्वयंप्रकाशित असून आपण निर्माण केलेला आवाज आकाशात पसरणाऱ्या मेघांच्या प्रचंड गडगडाटा सारखा आहे.॥८॥

एवाँ अग्निं वसूयवः सहसानं ववन्दिम ।

स नो विश्वा अति द्विषः पर्षन्नावेव सुक्रतुः॥९॥

धनाची आणि समृद्धीची इच्छा करणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण शत्रूंवर विजय मिळवणाऱ्या अत्यंत शक्तिशाली अग्निदेवांना वंदन करतो. ज्याप्रमाणे एक कुशल नावाडी नदी पार करण्यासाठी नौकेचा वापर करतो, त्याप्रमाणे अत्यंत बुद्धिवान आणि कल्याणकारी अग्निदेव आम्हांला आमच्या सर्व संकटांमधून आणि शत्रूंवर मात करण्यास सहाय्य करोत ही विनंती. ॥९॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२६

ऋषि- - वसूयव आत्रेयः **देवता** – अग्नि ९विश्वेदेव **छन्द** गायत्री

अग्ने पावक रोचिषा मन्द्रया देव जिह्वया ।

आ देवान्वक्षि यक्षि च ॥१॥

हे पवित्र करणाऱ्या, दिव्य प्रकाश आणि आनंददायी ज्वाळांनी युक्त असलेल्या अग्निदेवा! आपण आमच्या या यज्ञात सर्व देवांना घेऊन यावे आणि आमची आहुती त्यांच्यापर्यंत पोहोचवावी ही विनंती॥१॥

तं त्वा घृतस्नवीमहे चित्रभानो स्वर्दृशम् ।

देवाँ आ वीतये वह॥२॥

हे अद्भुत प्रकाशाच्या, सर्वद्रष्ट्या अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण घृताची आहुती स्वीकारण्यासाठी प्रार्थना करत आहोत. आपण आमच्या या यज्ञात अन्नग्रहण करण्यासाठी इतर सर्व देवांना घेऊन यावे ही विनंती.॥२॥

वीतिहोत्रं त्वा कवे द्युमन्तं समिधीमहि ।

अग्ने बृहन्तमध्वरे॥३॥

हे भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांचे ज्ञान असलेल्या अग्निदेवा ! यज्ञातील आहुती स्वीकारणाऱ्याकरता आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्याला या पवित्र यज्ञामध्ये प्रदीप्त करत आहोत.॥३॥.

अग्ने विश्वेभिरा गहि देवेभिर्हव्यदातये ।

होतारं त्वा वृणीमहे ॥४॥

हे अग्निदेवा ! आपण सर्व देवतांसह यज्ञातील आहुती स्वीकारण्यासाठी येथे यावे ही विनंती. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाचे मुख्य यज्ञकर्ते म्हणून आपली निवड करतो.॥४॥

यजमानाय सुन्वत आग्ने सुवीर्यं वह । देवैरा सत्सि बर्हिषि॥५॥

हे अग्निदेवा ! यज्ञकर्त्या आणि सोमरस सिद्ध करणाऱ्या भक्तगणांना आपण उत्तम सामर्थ्य व ऐश्वर्य प्रदान करावे आणि इतर देवतांसमवेत या यज्ञातील पवित्र कुशासनावर आसनस्थ व्हावे ही विनंती.॥५॥

समिधानः सहस्रजिदग्ने धर्माणि पुष्यसि ।

देवानां दूत उक्थ्यः॥६॥

हे चांगल्या प्रकारे प्रदीप्त झालेल्या आणि हजारो शत्रूंना जिंकणाऱ्या अग्निदेवा ! आपण सृष्टीचे नियम आणि धर्म वृद्धिंगत करता. आपण देवतांचे पूजनीय दूत आहात.॥६॥

न्यग्निं जातवेदसं होत्रवाहं यविष्ठ्यम् ।

दधाता देवमृत्विजम् ॥७॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! सर्व उत्पन्न झालेल्या गोष्टी जाणणाऱ्या (जातवेदा) यज्ञातील आहुती देवतांपर्यंत पोहोचवणाऱ्या (होत्रवाह), सदैव तरुण व ऊर्जावान असणाऱ्या अग्निदेवांना यज्ञातील मुख्य यज्ञकर्ते म्हणून यज्ञवेदीवर स्थापित करावे. ॥७॥

प्र यज्ञ एत्वानुषगद्या देवव्यचस्तमः ।

स्तृणीत बर्हिरासदे॥८॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुमचा हा यज्ञ यथायोग्य क्रमाने पुढे जात राहो. तुम्ही, अग्निदेवांना सामावून घेण्यासाठी अत्यंत विस्तीर्ण असलेल्या या यज्ञवेदीवर आसनस्थ होण्यासाठी दर्भासन पसरवावे.॥८॥

एदं मरुतो अश्विना मित्रः सीदन्तु वरुणः ।

देवासः सर्वया विशा॥९॥

मरुद्गण, दोन्ही अश्विनीकुमार, मित्रदेव आणि वरुणदेव आपण आपल्या सर्व सोबत्यांसहित या दर्भासनावर आसनस्थ व्हावे ही विनंती॥९॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२७

ऋषि- - १.२ त्र्यरुण त्रैवृष्ण, ३ त्रसदस्यु पौरुकुत्स्य ४-६ अश्वमेध भारत

देवता – अग्नि ६ इंद्र आणि अग्नि **छन्द** अनुष्टुप्

अनस्वन्ता सत्पतिर्मामहे मे गावा चेतिष्ठो असुरो मघोनः ।

त्रैवृष्णो अग्ने दशभिः सहस्रैर्वैश्वानर त्र्यरुणश्चिकेत॥१॥

त्र्यरुण त्रैवृष्ण ऋषि म्हणतात, “हे वैश्वानर अग्निदेवा! त्रिवृष्ण राजाचा पुत्र, अत्यंत बुद्धिमान, शक्तिशाली आणि दानशूरांमध्ये श्रेष्ठ असलेला, सज्जनांचे पालन करणाऱ्या राजा 'त्र्यरुण'ने मला बैलगाड्यांनी युक्त असे दोन श्रेष्ठ बैल आणि सोबतीला दहा हजार गायींचे दान दिले आहे”.॥१॥

यो मे शता च विंशतिं च गोनां हरी च युक्ता सुधुरा ददाति ।

वैश्वानर सुष्टुतो वावृधानोऽग्ने यच्छ त्र्यरुणाय शर्म॥२॥

त्र्यरुण त्रैवृष्ण ऋषि म्हणतात, “ज्या राजा त्र्यरुणाने मला शेकडो (सुवर्णमुद्रा), वीस गायी आणि रथाला जोडलेले, उत्तम प्रकारे ओझे वाहणारे दोन अश्व दान दिलेअशा राजा त्र्यरुणाला, माझ्या द्वारे उत्तमस्तुती केल्या गेलेल्या आणि त्या स्तुतीने प्रबळ झालेल्या, हे

वैश्वानर अग्निदेवा! उत्तम सुख आणि कल्याण प्रदान करावे ही विनंती.”॥२॥

एवा ते अग्ने सुमतिं चकानो नविष्ठाय नवमं त्रसदस्युः ।

यो मे गिरस्तुविजातस्य पूर्वीर्युक्तेनाभि त्र्यरुणो गृणाति॥३॥

त्रसदस्यु पौरुकुत्स्य ऋषि म्हणतात, “हे अग्निदेवा! आपली कृपाबुद्धी मिळवण्याची इच्छा ठेवणारा त्रसदस्यु राजा, आपल्यासाठी नूतन स्वरूपातील स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करतो. तो महाप्रतापी राजा त्र्यरुण, माझ्या या विस्तृत आणि प्राचीन स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करतो आणि त्यांची प्रशंसा करतो.”॥३॥

यो म इति प्रवोचत्यश्वमेधाय सूरये ।

ददृचा सनिं यते ददन्मेधामृतायते॥४॥

जो मनुष्य अश्वमेध यज्ञकरणाऱ्या ज्ञानी यजमानाला दान देण्यास (मदतीस) तयार आहे आणि जो सत्याचे आचरण करतो त्या सत्पुरुषाला हे अग्निदेवा ! आपण बुद्धी आणि ज्ञान प्रदान करावे ही विनंती.॥४॥

यस्य मा परुषाः शतमुद्धर्षयन्त्युक्षणः ।

अश्वमेधस्य दानाः सोमा इव त्र्याशिरः॥५॥

अश्वमेध भारत ऋषि म्हणतात, “ज्याप्रमाणे दूध दही आणि सत्तुमिश्रित सोमरस यज्ञामध्ये आनंद देतो, त्याप्रमाणे अश्वमेध राजाने दिलेले शंभर धष्टपुष्ट बैलांचे दान मला आनंदित करतात. “॥५॥

इन्द्राग्नी शतदाव्न्यश्वमेधे सुवीर्यम् ।

क्षत्रं धारयतं बृहद्दिवि सूर्यमिवाजरम्॥६॥

हे अश्वमेध यज्ञाचे रक्षण करणाऱ्या इंद्रदेवा आणि अग्निदेवा ! आकाशामध्ये चमकणाऱ्या चिरंतन आणि अविनाशी सूर्यदेवांप्रमाणे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना उत्तम सामर्थ्य आणि श्रेष्ठ वीर पुत्रांचे सुख प्रदान करावे ही विनंती. ॥६॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२८

ऋषि- विश्ववारा आत्रेयी **देवता** – अग्नि **छन्द** १,३ त्रिष्टुप् २ जगती ४ अनुष्टुप् ५,६ गायत्री

समिद्धो अग्निर्दिवि शोचिरश्रेत्प्रत्यङ्डुषसमुर्विया वि भाति ।
एति प्राची विश्ववारा नमोभिर्देवाँ ईळाना हविषा घृताची॥१॥

उत्तम प्रकारे प्रदीप्त झालेल्या अग्निदेवांचे तेज आकाशात पोहोचले आहे. अग्निदेव विस्तीर्णपणे पसरणाऱ्या उषादेवतेच्या सन्मुख होऊन विशेष रूपाने प्रकाशमान होत आहेत. सर्व जगाचे कल्याण करणारी पूर्वेकडून येणारी उषादेवता आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे नमस्कार आणि आणि हविष्यान्नाची आहुती अग्निदेवांना समर्पित करत त्यांना जागृत करत आहे.॥१॥

समिध्यमानो अमृतस्य राजसि हविष्कृण्वन्तं सचसे स्वस्तये ।
विश्वं स धत्ते द्रविणं यमिन्वस्यातिथ्यमग्ने नि च धत्त इत्पुरः॥२॥

हे उत्तम प्रकारे प्रदीप्त होणाऱ्या अग्निदेवा ! आपण अमरत्वाचे स्वामी आहात. आपल्याला हविष्यान्नाची आहुती अर्पण करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सोबत राहून कल्याण करत रक्षण करता. जे यज्ञकर्ते भक्तगण यज्ञवेदी मध्ये आपल्याला अतिथी मानून स्थापना करतात

त्यांना आपण विश्वातील सर्व प्रकारचे वैभव आणि धन प्रदान करता॥२॥

अग्ने शर्ध महते सौभगाय तव द्युम्नान्युत्तमानि सन्तु ।

सं जास्पत्यं सुयममा कृणुष्व शत्रूयतामभि तिष्ठा महांसि॥३॥

हे अग्निदेवा ! आम्हाला महान सौभाग्यासाठी शक्ती व सामर्थ्य द्यावे तसेच आपल्या कृपेने श्रेष्ठ आणि उत्तम सौभाग्य प्राप्त व्हावे ही विनंती. आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पती-पत्नीच्या नात्याला सुखी, संयमित आणि आदर्श बनवावे, तसेच आमच्याशी शत्रुत्वाची भावना ठेवणाऱ्यांच्या सामर्थ्याचा आणि गर्वाचा पराभव करावा ही विनंती॥३॥

समिद्धस्य प्रमहसोऽग्ने वन्दे तव श्रियम् ।

वृषभो द्युम्नवाँ असि समध्वरेष्विध्यसे॥४॥

हे अत्यंत तेजस्वी आणि उत्तम प्रकारे प्रदीप्त झालेल्या अग्निदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या दिव्य सौंदर्याला आणि वैभवाला वंदन करतो. आपण अत्यंत सामर्थ्यवान आणि तेजस्वी असून सर्व यज्ञांमध्ये आपल्याला उत्तम प्रकारे प्रदीप्त केले जाते॥४॥

समिद्धो अग्न आहुत देवान्यक्षि स्वध्वर ।

त्वं हि हव्यवाळसि ॥५॥

हे उत्तम प्रकारे प्रदीप्त झालेल्या आणि आहुती देऊन आवाहन केलेल्या अग्निदेवा ! आपण उत्तम प्रकारे यज्ञ करणारे आहात. आपण सर्व देवतांना आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये आमंत्रित करावे कारण आपण देवतांपर्यंत हविष्यान्नाची आहुती पोहोचवणारे आहात॥५॥

आ जुहोता दुवस्यताग्निं प्रयत्यध्वरे । वृणीध्वं हव्यवाहनम्॥६॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो सुरू असलेल्या या पवित्र हिंसारहित यज्ञात तुम्ही सर्वजण अग्निदेवांची पूजा करावी आणि हविष्यान्नाची आहुती अर्पण करावी. यज्ञातील हविष्यान्नाची आहुती देवतांपर्यंत पोहोचवण्यासाठी भक्तगणांनो तुम्ही अग्निदेवांची निवड करावी.॥६॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-२९

ऋषि- गौरिवीति शाक्त्य आत्रेयी **देवता** – अग्नि **छन्द** त्रिष्टुप्

त्र्यर्यमा मनुषो देवताता त्री रोचना दिव्या धारयन्त ।

अर्चन्ति त्वा मरुतः पूतदक्षास्त्वमेषामृषिरिन्द्रासि धीरः॥१॥

मित्र, वरुण आणि अर्यमा (त्र्यर्यमा) हे तिन्ही देव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कल्याणासाठी तीन दिव्य आणि प्रकाशमान लोक (स्वर्ग, पृथ्वी आणि अंतरिक्ष) प्रस्थापित करतात. हे इंद्रदेवा! अत्यंत पवित्र शक्ती असलेले मरुद्गण आपली स्तुती करतात, कारण आपण या सर्व मरुद्गणांचे परम बुद्धिमान, धैर्यवान आणि ज्ञानी मार्गदर्शक आहात .॥१॥

अनु यदीं मरुतो मन्दसानमार्चन्निन्द्रं पपिवांसं सुतस्य ।

आदत्त वज्रमभि यदहिं हन्नपो यह्वीरसृजत्सर्तवा उ॥२॥

जेव्हा सोमरसाचे प्राशन करून हर्षोल्लसित झालेल्या इंद्रदेवांची मरुद्गणांनी स्तुती केली, तेव्हा इंद्रदेवांनी आपल्या हातातील वज्राने 'अहि' (वृत्रासुर) राक्षसाचा वध केला आणि अडवून ठेवलेले ते अथांग, महान जल वाहण्यासाठी मुक्त केले.॥२॥

उत ब्रह्माणो मरुतो मे अस्येन्द्रः सोमस्य सुषुतस्य पेयाः ।

तद्धि हव्यं मनुषे गा अविन्ददहन्नहिं पपिवाँ इन्द्रो अस्य॥३॥

स्तुती करणाऱ्या मरुद्गणांनी तसेच इंद्रदेवांनी आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी उत्तम प्रकारे तयार केलेल्या सोमरसाचे प्राशन करावे ही विनंती, कारण त्या सोमरसाचे प्राशन करूनच इंद्रदेवांनी भक्तगणांसाठी गायी मिळवून दिल्या आणि अहि नावाच्या राक्षसाचा वध केला.॥३॥

आद्रोदसी वितरं वि ष्कभायत्संविव्यानश्चिद्भियसे मृगं कः ।

जिगर्तिमिन्द्रो अपजर्गुराणः प्रति श्वसन्तमव दानवं हन्॥४॥

इंद्रदेवांनी पृथ्वी आणि स्वर्ग या दोन्ही विश्वांना पक्के धरून ठेवले. अत्यंत सामर्थ्यवान इंद्रदेवांच्या भयाने हिंस्र पशुसमान (वृत्रासुर) राक्षस थरथर कापला. इंद्रदेवांनी गर्जना करणाऱ्या,सर्वांना गिळंकृत करणाऱ्या, आव्हानात्मक फुत्कारणाऱ्या दनूचा पुत्र वृत्रासुराचा वध केला.॥४॥

अध क्रत्वा मघवन्तुभ्यं देवा अनु विश्वे अददुः सोमपेयम् ।

यत्सूर्यस्य हरितः पतन्तीः पुरः सतीरुपरा एतशे कः॥५॥

हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा ! आपल्या याच महान पराक्रमामुळे सर्व देवांनी आपल्याला सोमरस पिण्याचा प्रथम अधिकार दिला. जेव्हा सूर्यदेवांचे वेगाने धावणारे अश्व पूर्व दिशेकडून मार्गक्रमण करत पश्चिमेकडे जात

होते, तेव्हा आपण त्या 'एतश'अश्वांसाठी साठी मार्ग मोकळा केला.॥५॥

नव यदस्य नवतिं च भोगान्त्साकं वज्रेण मघवा विवृश्चत् ।

अर्चन्तीन्द्रं मरुतः सधस्थे त्रैष्टुभेन वचसा बाधत द्याम्॥६॥

जेव्हा ऐश्वर्यशाली इंद्रदेवांनी आपल्या वज्राने शंबरासुराचे नव्व्याण्णव अभेद्य किल्ले एकाच वेळी नष्ट केले त्यावेळी एकत्र आलेल्या मरुद्गणांनी त्रिष्टुप् छंदातील स्तुतियुक्त स्तोत्रांनी इंद्रदेवांची पूजा केली आणि आपल्या धीर गंभीर वाणीने संपूर्ण आकाशाला व्यापून टाकले.॥६॥

सखा सख्ये अपचत्तूयमग्निरस्य क्रत्वा महिषा त्री शतानि ।

त्री साकमिन्द्रो मनुषः सरांसि सुतं पिबद्वृत्रहत्याय सोमम्॥७॥

अग्निदेवांनी आपला मित्र असलेल्या इंद्रदेवांसाठी तीनशे म्हशी त्वरित शिजवल्या. वृत्रासुराचा वध करण्यासाठी इंद्रदेवांनी भक्तगणांनी सिद्ध केलेला तीन विशाल पात्रात भरलेला सोमरस एकाच वेळी प्राशन केला.॥७॥

त्री यच्छता महिषाणामघो मास्त्री सरांसि मघवा सोम्यापाः ।

कारं न विश्वे अह्वन्त देवा भरमिन्द्राय यदहिं जघान॥८॥

ज्या वेळी इंद्रदेवांनी वृत्रासुराचा वध केला, तीन मोठ्या आणि सरोवरासारख्या विशाल पात्रांमधील सोमरस प्राशन केला त्यावेळी सर्व देवतांनी युद्धातील विजयासाठी इंद्रदेवांचे आवाहन केले होते.॥८॥

उशना यत्सहस्यैरयातं गृहमिन्द्र जूजुवानेभिरश्वैः ।

वन्वानो अत्र सरथं ययाथ कुत्सेन देवैरवनोर्ह शुष्णम्॥९॥

हे इंद्रदेवा ! जेव्हा आपण उशना ऋषी आणि आपल्या बलवान शक्तींसह, वेगाने धावणाऱ्या अश्वांच्या रथात बसून निवासस्थानी निघालात, तेव्हा या युद्धात आपण कुत्सऋषींच्या सोबत एकाच रथात आरूढ होऊन प्रवास केलात. आपण अन्य सर्व देवतांच्या साहाय्याने शुष्णासुराचा पूर्णपणे विनाश केलात.॥९॥

प्रान्यच्चक्रमवृहः सूर्यस्य कुत्सायान्यद्धरिवो यातवेऽकः ।

अनासो दस्यूँरमृणो वधेन नि दुर्योण आवृणङ्मृध्रवाचः॥१०॥

हे इंद्रदेवा ! आपण कुत्सऋषींना पुढे जाण्यासाठी मार्ग करून दिला आणि त्यासाठी सूर्यदेवांच्या रथाचे एक चाक उखडून टाकले तर दुसरे चाक चालण्यासाठी मोकळे केले. आपण शस्त्राने त्या नाक नसलेल्या विद्रूप दस्यूंचा संहार केला आणि अपशब्द बोलणाऱ्या दुष्टांना त्यांच्याच घरात कोंडून नष्ट केले.॥१०॥

स्तोमासस्त्वा गौरिवीतेरवर्धन्नरन्धयो वैदथिनाय पिप्रुम् ।

आ त्वामृजिश्वा सख्याय चक्रे पचन्पक्तीरपिबः सोममस्य॥११॥

हे इंद्रदेवा ! गौरिवीती ऋषींच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपले बळ वाढवले. आपण विदथाचा पुत्र 'ऋजिश्वा' याच्यासाठी 'पिप्रु' नावाच्या राक्षसाला पराभूत केले. त्याच ऋजिश्वाने आपल्याशी मैत्री करण्याकरता शिजवलेल्या हविष्यान्नाचा स्वीकारून त्यातील सोमरस प्राशन केला.॥११॥

नवग्वासः सुतसोमास इन्द्रं दशग्वासो अभ्यर्चन्त्यर्कैः ।

गव्यं चिदूर्वमपिधानवन्तं तं चिन्नरः शशमाना अप व्रन्॥१२॥

नऊ महिने (नवग्वा) आणि दहामहिने (दशग्वा) चालणाऱ्या यज्ञात आङ्गिरस ऋषींच्या वंशातील ऋषींनी सोमरस सिद्ध करून इंद्रदेवांची स्तुती केली. त्या पराक्रमी ऋषींनी निरंतर प्रयत्न आणि प्रार्थना करून गुहेमध्ये अडकवलेल्या गायींच्या कळपाला मुक्त केले.॥१२॥

कथो नु ते परि चराणि विद्वान्वीर्या मघवन्या चकर्थ ।

या चो नु नव्या कृणवः शविष्ठ प्रेदु ता ते विदथेषु ब्रवाम॥१३॥

हे ऐश्वर्यवान मघवन् इंद्रदेवा ! आपण जे पूर्वी पराक्रम केले आहेत ते जाणणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण त्या पराक्रमांची स्तुती कशी बरे करू? हे बलशाली इंद्रदेवा ! आपण जे नवीन पराक्रम कराल त्या सर्व पराक्रमांचे यज्ञकार्यामध्ये निश्चितपणे वर्णन करू.॥१३॥

एता विश्वा चकृवाँ इन्द्र भूर्यपरीतो जनुषा वीर्येण ।

या चिन्नु वज्रिन्कृणवो दधृष्वान्न ते वर्ता तविष्या अस्ति तस्याः॥१४॥

हे जन्मापासूनच अपराजित आणि महान पराक्रमी इंद्रदेवा ! ही सर्व प्रचंड कार्ये आपणच केली आहेत. हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपण धैर्याने जे काही पराक्रम करता, त्या आपल्या अफाट शक्तीला रोखणारा या जगात कोणीही नाही.॥१४॥

इन्द्र ब्रह्म क्रियमाणा जुषस्व या ते शविष्ठ नव्या अकर्म ।

वस्त्रेव भद्रा सुकृता वसूयू रथं न धीरः स्वपा अतक्षम्॥१५॥

हे अत्यंत बलशाली इंद्रदेवा ! ऐश्वर्याची इच्छा बाळगणारे आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्यासाठी ही नवीन प्रार्थना रचली आहे. ज्याप्रमाणे एखादा कुशल आणि बुद्धिमान कारागीर उत्तम रथ घडवतो त्याप्रमाणे आम्ही ही स्तुती आमच्या बुद्धीने तयार केली आहे. आपण आमच्या रचलेल्या स्तोत्रांचा आनंदाने स्वीकार करावा ही विनंती.॥१५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३०

ऋषि- बभ्रू आत्रेय **देवता** – इंद्रदेव आणि राजा ऋणञ्चय **छन्द** त्रिष्टुप्

क्व स्य वीरः को अपश्यदिन्द्रं सुखरथमीयमानं हरिभ्याम् ।

यो राया वज्री सुतसोममिच्छन्तदोको गन्ता पुरुहूत ऊती॥१॥

सुख देणाऱ्या रथावर आरूढ होऊन, आपल्या 'हरी' नावाच्या दोन अश्वांसह वेगाने जाणारे प्रसिद्ध वीर इंद्रदेव कुठे आहेत बरे ? वज्रधारी ऐश्वर्यसंपन्न इंद्रदेव सोमरस सिद्ध तयार करणाऱ्या भक्तगणांचा शोध घेत त्यांच्या निवासस्थानी जात असतात. अशा अनेकांद्वारे आवाहन केलेल्या (पुरुहूत) इंद्रदेवांना कोणी पाहिले आहे का?॥१॥

अवाचचक्षं पदमस्य सस्वरुग्रं निधातुरन्वायमिच्छन् ।

अपृच्छमन्याँ उत ते म आहुरिन्द्रं नरो बुबुधाना अशेम ॥२॥

बभ्रुऋषि म्हणतात , " मी या सृष्टीचे रक्षण आणि धारण करणाऱ्या इंद्रदेवाचे ते गुप्त आणि अत्यंत उग्र स्थान अंतर्दृष्टीने पाहिले आहे. त्या परमस्थानाचे दर्शन घेण्याच्या इच्छेने मी त्याचा पाठपुरावा करून ते स्थान प्राप्त केले. मी इतर विद्वानांकडे इंद्रदेवांविषयी चौकशी केली, तेव्हा ज्ञानी पुरुषांनी सांगितले आहे की आपण सर्व जण परम ऐश्वर्यशाली इंद्रदेवांना प्राप्त करूया"॥२॥

प्र नु वयं सुते या ते कृतानीन्द्र ब्रवाम यानि नो जुजोषः ।
वेददविद्वाञ्छृणवच्च विद्वान्वहतेऽयं मघवा सर्वसेनः॥३॥

हे इंद्रदेवा ! सोमरस सिद्ध करत असताना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या त्या महान पराक्रमांचे आणि पूर्व कर्मांचे वर्णन करतो, ज्यांचा आपण आनंदाने स्वीकार करता. आपल्या या दिव्य गुणांना आणि पराक्रमाला अज्ञानी जाणून घेतो आणि ज्ञानी देखील ते आदराने श्रवण करतो. सर्वांना धन देणारे, परम ऐश्वर्यशाली इंद्रदेव आपल्या संपूर्ण सेनेसह भक्तांच्या रक्षणासाठी पुढे येतात.॥३॥

स्थिरं मनश्चकृषे जात इन्द्र वेषीदेको युधये भूयसश्चित् ।
अश्मानं चिच्छवसा दिद्युतो वि विदो गवामूर्वमुस्रियाणाम्॥४॥

हे इंद्रदेवा ! आपण जन्म घेताच आपले मन दृढ करून संख्येने खूप जास्त असलेल्या शत्रूंशी लढण्यासाठी एकटेच धावून गेलात. आपण स्वतःच्या सामर्थ्याने दिव्य तेज असलेल्या वज्राने कठीण खडकाला विदीर्ण केले आणि अंधाऱ्या गुहेत कोंडून ठेवलेल्या दुभत्या गायींना मुक्त केले.॥४॥

परो यत्त्वं परम आजनिष्ठाः परावति श्रुत्यं नाम बिभ्रत् ।
अतश्चिदिन्द्रादभयन्त देवा विश्वा अपो अजयद्दासपत्नीः॥५॥

हे इंद्रदेवा ! जेव्हा आपण अत्यंत दूरवरच्या दिव्य लोकात जन्म घेतला तेव्हा आपल्या पराक्रमामुळे सर्व देव आश्चर्यचकित झाले. त्यानंतर आपण असुरांच्या बंधनात अडकलेल्या सर्व नद्यांना आणि जलप्रवाहांना मुक्त केले.॥५॥

तुभ्येदेते मरुतः सुशेवा अर्चन्त्यर्कं सुन्वन्त्यन्धः ।

अहिमोहानमप आशयानं प्र मायाभिर्मायिनं सक्षदिन्द्रः॥६॥

हे इंद्रदेवा ! मरुद्गण केवळ आपल्यासाठीच ही अत्यंत सुख देणारी स्तुतियुक्त स्तोत्रे पठण करत आहेत आणि सोमरस सिद्ध करत आहेत. इंद्रदेवांनी गर्वाने फुगलेल्या, जलाला अडवून ठेवलेल्या, कपटी वृत्रासुर नावाच्या असुराला आपल्या दिव्य शक्तीने पराभूत केले. ॥६॥

वि षू मृधो जनुषा दानमिन्वन्नहन्गवा मघवन्त्संचकानः ।

अत्रा दासस्य नमुचेः शिरो यदवर्तयो मनवे गातुमिच्छन् ॥७॥

हे ऐश्वर्यवान मघवन् इंद्रदेवा ! आपण आपल्या जन्मापासूनच हिंसक विरोधकांचा नाश करणारे आणि यज्ञातील दानाचा स्वीकार करणारे आहात . गायींची, मनुष्यांच्या कल्याणाचा प्रगतीचा मार्ग मोकळ्या करण्याच्या तीव्र इच्छेने आपण युद्धात नमुची नावाच्या असुराचे मस्तक धडावेगळे केले.॥७॥

युजं हि मामकृथा आदिदिन्द्र शिरो दासस्य नमुचेर्मथायन् ।

अश्मानं चित्स्वर्यं वर्तमानं प्र चक्रियेव रोदसी मरुद्भ्यः॥८॥

हे इंद्रदेवा ! नमुची असुराचे मस्तक धडापासून वेगळे करत असताना आपण मरुद्गणांना साथीदार म्हणून बरोबर घेतले आणि तेजस्वी, दगडासारखे कठोर असणाऱ्या पृथ्वी आणि आकाश या दोन्ही लोकांना वेगाने फिरणाऱ्या रथाच्या चाका प्रमाणे मरुद्गणांसाठी फिरवून टाकले.॥८॥

स्त्रियो हि दास आयुधानि चक्रे किं मा करन्नबला अस्य सेनाः ।

अन्तर्ह्यख्यदुभे अस्य धेने अथोप प्रैद्युधये दस्युमिन्द्रः॥९॥

हे इंद्रदेवा ! नामुची नावाच्या असुराने स्त्रियांना आपली शस्त्रे बनवले. ही दुर्बल सेना माझे काहीही वाकडे करू शकणार नाही हे इंद्रदेवांनी मनोमन जाणले. त्यानंतर इंद्रदेवांनी दोन दुभत्या गायींना मुक्त केले आणि त्या असुराशी युद्ध करण्यासाठी पुढे धावून गेले.॥९॥

समत्र गावोऽभितोऽनवन्तेहेह वत्सैर्वियुता यदासन् ।

सं ता इन्द्रो असृजदस्य शाकैर्यदीं सोमासः सुषुता अमन्दन्॥१०॥

जेव्हा आपल्या वासरांपासून ताटातूट झालेल्या गायी इकडेतिकडे सर्व बाजूंनी एकत्र येऊन हंबरत होत्या, तेव्हा चांगल्या प्रकारे सिद्ध केलेल्या सोमरसाच्या प्राशनाने हर्षित झालेल्या इंद्रदेवांनी आपल्या

अफाट सामर्थ्याने त्या गायींची त्यांच्या वासरांशी पुन्हा भेट घडवून आणली.॥१०॥

यदीं सोमा बभ्रुधूता अमन्दन्नरोरवीद्वृषभः सादनेषु ।

पुरंदरः पपिवाँ इन्द्रो अस्य पुनर्गवामददादुस्रियाणाम्॥११॥

तांबूस किंवा गौर रंगाच्या (बभ्रुधूताः) ऋषींच्या हातांनी सिद्ध केलेला सोमरस पाहून इंद्रदेव प्रसन्न झाले. शत्रूंच्या किल्ल्यांचा नाश करणाऱ्या आणि बलवान इंद्रदेवांनी आपल्या आसनावर बसून मोठ्याने गर्जना केली. सोमरस प्राशन करून इंद्रदेवांनी दुभत्या गायी परत मिळवल्या.॥११॥

भद्रमिदं रुशमा अग्ने अक्रन्गवां चत्वारि ददतः सहस्रा ।

ऋणंचयस्य प्रयता मघानि प्रत्यग्रभीष्म नृतमस्य नृणाम् ॥१२॥

हे अग्निदेवा! रुशमा नावाच्या विदुषींनीआम्हाला चार हजार गायी देऊन अत्यंत कल्याणकारी कार्य केले आहे. मनुष्यांमध्ये अत्यंत श्रेष्ठ आणि सर्वोत्तम नायक असलेल्या त्या 'ऋणंचयाने ' भक्तीने दिलेले धन आम्ही आनंदाने स्वीकारले आहे.॥१२॥

सुपेशसं माव सृजन्त्यस्तं गवां सहस्रै रुशमासो अग्ने ।

तीव्रा इन्द्रममन्दुः सुतासोऽक्तोर्व्युष्टौ परितक्म्यायाः॥१३॥

रुशमा नावाच्या विदुषींनी रात्रीच्या समाप्तीला, पहाटेच्या वेळी आम्हाला अलंकार व वस्त्रांनी सजवलेली निवासस्थानांचे आणि गायींचे दान केले. त्या विदूषीं आपल्या निवासस्थानी परतल्या त्यावेळी यज्ञामध्ये सिद्ध केलेल्या सोमरसाने आम्ही इंद्रदेवांना प्रसन्न केले.॥१३॥

औच्छत्सा रात्री परितक्म्या याँ ऋणंचये राजनि रुशमानाम् ।

अत्यो न वाजी रघुरज्यमानो बभ्रुश्चत्वार्यसनत्सहस्रा॥१४॥

संपूर्ण रात्र संपत आली आणि तेजस्वीपणे चमकणारी पहाट ऋणंचय राजाच्या राज्यात उजाडत होती त्यावेळी वेगाने धावणाऱ्या आणि पुढे जाणाऱ्या शक्तिशाली अश्वाप्रमाणे, बभ्रुः ऋषींनी रुशमा नावाच्या विदूषींकडून चार हजार गायीचे दान प्राप्त केले॥१४॥

चतुःसहस्रं गव्यस्य पश्वः प्रत्यग्रभीष्म रुशमेष्वग्ने ।

घर्मश्चित्तप्तः प्रवृजे य आसीदयस्मयस्तम्वादाम विप्राः॥१५॥

हे अग्निदेवा! आम्ही रुशमा नावाच्या विदूषींकडून चार हजार गायींचा स्वीकार केला आहे. यज्ञामध्ये गायींचे दूध काढण्यासाठी सोन्यासारख्या तेजस्वी, तप्त कलशाचा आम्ही स्वीकार केला आहे. ॥१५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३१

ऋषि- अवस्यु आत्रेय **देवता** – इंद्रदेव आणि कुत्स **छन्द** त्रिष्टुप्

कुत्स ऋषी आणि देवराज इंद्रदेव हे दोघे दिसायला हुबेहूब एकमेकांसारखे होते. ऋग्वेदातील एका कथेनुसार, एकदा इंद्रदेवांची ची पत्नी 'शची' (इंद्राणी) सुद्धा या दोघांमध्ये खरा इंद्र कोणता, हे ओळखू शकली नव्हती.

इन्द्रो रथाय प्रवतं कृणोति यमध्यस्थान्मघवा वाजयन्तम् ।

यूथेव पश्वो व्युनोति गोपा अरिष्टो याति प्रथमः सिषासन्॥१॥

ज्या वेगवान आणि विजयी रथावर धनवान इंद्रदेव स्वतः आरूढ झाले आहेत, त्या रथासाठी ते स्वतः अनुकूल आणि गतिमान मार्ग तयार करतात. ज्याप्रमाणे एखादा उत्तम गुराखी आपल्या पशूंच्या कळपाला नियंत्रित ठेवतो त्याप्रमाणे इंद्रदेव शत्रूंवर नियंत्रण ठेवतात. असा हा विजय मिळवून देणारा रथ सुरक्षितपणे सर्वात पुढे निघून जातो.॥१॥

आ प्र द्रव हरिवो मा वि वेनः पिशङ्गराते अभि नः सचस्व ।

नहि त्वदिन्द्र वस्यो अन्यदस्त्यमेनाँश्चिज्जनिवतश्चकर्थ॥२॥

हे हरी नावाच्या अश्वांचे स्वामी आणि सुवर्णमय धन (पिशङ्गराते) प्रदान करणाऱ्या इंद्रादेवा ! आपण वेगाने आमच्याकडे धावून यावे

आणि आमच्याकडे दुर्लक्ष करू नये ही विनंती. हे इंद्रादेवा ! आपल्यापेक्षा श्रेष्ठ आणि कल्याणकारी या जगात दुसरे कोणीही नाही. आपण पत्नी नसलेल्या एकाकी पुरुषांनाही कुटुंबवत्सल बनवता. ॥२॥

उद्यत्सहः सहस आजनिष्ट देदिष्ट इन्द्र इन्द्रियाणि विश्वा ।

प्राचोदयत्सुदुघा वव्रे अन्तर्वि ज्योतिषा संववृत्वत्तमोऽवः॥३॥

वाढत्या सामर्थ्याने संपन्न असलेले (उद्यत्सहः) इंद्रदेव शत्रूंचा पराभव करण्यासाठी (सहसे) प्रकट झाले (आजनिष्ट) आहेत. इंद्रियांचे सामर्थ्य (इन्द्रियाणि) असलेले इंद्रदेव अंधाऱ्या गुहेत कोंडून ठेवलेल्या, उत्तम दूध देणाऱ्या गायींना मुक्त करतात आणि आपल्या तेजाने अंधार दूर करतात. ॥३॥

अनवस्ते रथमश्वाय तक्षन्त्वष्टा वज्रं पुरुहूत द्युमन्तम् ।

ब्रह्माण इन्द्रं महयन्तो अर्कैरवर्धयन्नहये हन्तवा उ॥४॥

त्वष्टदेवांनी, अनेकांनी आवाहन केलेल्या इंद्रदेवांच्या अश्वांसाठी सुयोग्य असा रथ निर्माण केला आणि तेजस्वी असे वज्र घडवले. स्तुती करणाऱ्या ऋषींनी , महिमा कथन करणाऱ्या स्तोत्रांचे पठण करत वृत्रासुराचा वध करण्यासाठी इंद्रदेवांची शक्ती वाढवली.॥४॥

वृष्णे यत्ते वृषणो अर्कमर्चानिन्द्र ग्रावाणो अदितिः सजोषाः ।

अनश्वासो ये पवयोऽरथा इन्द्रेषिता अभ्यवर्तन्त दस्यून्॥५॥

हे सामर्थ्यवान इंद्रदेवा ! आपली स्तुती करणारे, सोमरस सिद्ध करणारे शक्तिशाली पाषाण एकत्र येऊन आपल्या तेजाची स्तुती करतात, त्यावेळी आपल्यामुळे प्रेरित झालेली अश्वांशिवाय आणि रथाशिवाय आपली वेगवान शस्त्रे, दस्यूंवर वेगाने तुटून पडतात आणि त्यांचा नाश करतात. ॥५॥

प्र ते पूर्वाणि करणानि वोचं प्र नूतना मघवन्या चकर्थ ।

शक्तीवो यद्विभरा रोदसी उभे जयन्नपो मनवे दानुचित्राः॥६॥

हे ऐश्वर्यशाली आणि शक्तिमान इंद्रदेवा ! आम्ही भक्तगण आपल्या भूतकाळातील आणि वर्तमान काळातील अलौकिक कार्याचे वर्णन करत आहोत. आपण आपल्या अफाट सामर्थ्याने पृथ्वी आणि आकाश या दोन्ही लोकांचे पालन-पोषण करता आणि मानवाच्या कल्याणासाठी अद्भुत जलस्रोतांचे रक्षण करता.॥६॥

तदिन्नु ते करणं दस्म विप्राहिं यद्घ्नन्नोजो अत्रामिमीथाः ।

शुष्णस्य चित्परि माया अगृभ्णाः प्रपित्वं यन्नप दस्यूँरसेधः॥७॥

हे शत्रूंचा संहार करणाऱ्या आणि परम बुद्धिमान इंद्रदेवा ! अहि असुराचा वध करून आपण, आपले अफाट सामर्थ्य प्रकट केले आहे.

शोषण करणाऱ्या 'शुष्ण' असुराच्या सर्व मायावी शक्तींना सर्व बाजूनी नष्ट करून सर्व दस्यूंना पार पळवून लावलेत.॥७॥

त्वमपो यदवे तुर्वशायारमयः सुदुघाः पार इन्द्र ।

उग्रमयातमवहो ह कुत्सं सं ह यद्वामुशनारन्त देवाः॥८॥

हे पराक्रमी इंद्रदेवा! आपण'तुर्वश' राजाच्या रक्षणासाठी नद्यांना अथांग पाणी, पैलतीरावर सहज दूध देणाऱ्या गायींप्रमाणे पुरवले. उशना ऋषींनी आपल्याला आणि कुत्सऋषींना एकत्र आणून रक्षण करण्यासाठी शत्रूंचा नाश केला. ॥८॥

इन्द्राकुत्सा वहमाना रथेना वामत्या अपि कर्णे वहन्तु ।

निः षीमद्भ्यो धमथो निः षधस्थान्मघोनो हृदो वरथस्तमांसि॥९॥

हे इंद्रदेवा आणि कुत्सऋषि ! वेगवान अश्वांनी जोडलेल्या एकाच रथात स्वार होऊन आपण दोघे स्तुती करणाऱ्या भक्तगणांच्या जवळ यावे ही विनंती. आपण दोघांनी असुरांना जलाशयातील मूळ स्थानावरून पार पिटाळून लावले आणि यज्ञ करणाऱ्या धनवान भक्तगणांच्या हृदयातून अज्ञानाचा आणि भीतीचा सर्व अंधकार दूर केलात .॥९॥

वातस्य युक्तान्त्सुयुजश्चिदश्वान्कविश्चिदेषो अजगन्नवस्युः ।

विश्वे ते अत्र मरुतः सखाय इन्द्र ब्रह्माणि तविषीमवर्धन्॥१०॥

वायुवेग असलेले आणि उत्तम प्रकारे नियंत्रित केलेले अश्व रथाला जोडून रक्षण करण्याची इच्छा असणारे (अवस्यु), भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेले इंद्रदेव येथे आले आहेत. हे इंद्रदेवा ! आपले सखे मरुद्गण स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करत आपले सामर्थ्य वाढवत आहेत.॥१०॥.

सूरश्चिद्रथं परितक्म्यायां पूर्वं करदुपरं जूजुवांसम् ।
भरच्चक्रमेतशः सं रिणाति पुरो दधत्सनिष्यति क्रतुं नः॥११॥

वेगाने धावणाऱ्या सूर्यदेवांच्या रथाला मागे टाकून इंद्रदेवांनी आपल्या 'एतश' नावाच्या अत्यंत गतिमान अश्वाला स्पर्धेच्या भूमीत पुढे केले आणि रथाचे चाक पुढे नेऊन विजय मिळवून दिला. ऐश्वर्यशाली इंद्रदेव यज्ञकर्त्या भक्तगणांच्या संकल्पांचे रक्षण करोत.॥११॥

आयं जना अभिचक्षे जगामेन्द्रः सखायं सुतसोममिच्छन् ।
वदन्ग्रावाव वेदिं भ्रियाते यस्य जीरमध्वर्यवश्चरन्ति ॥१२॥

हे भक्तगणांनो ! ज्यांच्या यज्ञामध्ये सोमरस सिद्ध करणारा पाषाण आवाज करत यज्ञवेदीजवळ ठेवला जातो आणि यज्ञकर्ता भक्तगण वेगाने यज्ञकर्म करत असतो अशा भक्तमित्राला भेटण्याच्या इच्छेने इंद्रदेव दर्शन देण्यासाठी येथे आले आहेत.॥१२॥

ये चाकनन्त चाकनन्त नू ते मर्ता अमृत मो ते अंह आरन् ।

वावन्धि यज्यूँरुत तेषु धेह्योजो जनेषु येषु ते स्याम॥१३॥

हे अमर इंद्रदेवा ! जे मर्त्य मानव अत्यंत उत्कटतेने आणि वारंवार आपले आवाहन करत असतात अशा भक्तगणांना कोणतेही पाप लागत नाही, त्यांच्यावर आपण प्रसन्न व्हावे ही विनंती. अशा लोकांमध्ये राहून आम्ही आपले प्रिय भक्त होण्यासाठी आम्हाला सामर्थ्य शक्ती प्रदान करावी ही विनंती॥१३॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३२

ऋषि- गातु आत्रेय आत्रेय **देवता** – इंद्रदेव **छन्द** त्रिष्टुप्

अदर्दरुत्समसृजो वि खानि त्वमर्णवान्बद्बधानाँ अरम्णाः ।

महान्तमिन्द्र पर्वतं वि यद्वः सृजो वि धारा अव दानवं हन् ॥१॥

हे इंद्रदेवा! आपण दानवांनी अडवून ठेवलेल्या पाण्याच्या झऱ्याला (उत्सम्)आणि नद्यांना (अर्णव) आपण बंधनातून मुक्त करून प्रवाहित केले. हे इंद्रदेवा ! आपण विशाल मेघाला विदीर्ण करून त्यातील पाण्याचा प्रवाह भूमीवर मुक्तपणे प्रवाहित आणि समुद्राला (अर्णवान्) अधिक जल प्रदान करून संतुष्ट केले आपणच राक्षसांचाही संहार केलात .॥१॥

त्वमुत्साँ ऋतुभिर्बद्बधानाँ अरंह ऊधः पर्वतस्य वज्रिन् ।

अहिं चिदुग्र प्रयुतं शयानं जघन्वाँ इन्द्र तविषीमधत्थाः॥२॥

हे वज्रधारी इंद्रदेवा! निसर्गाच्या नियमानुसार बंधनात पडलेल्या पाण्याचा साठा असलेल्या ढगांना मुक्त केले आणि जलप्रवाह मुक्त केले. हे पराक्रमी इंद्रदेवा! आपण पाण्यात निद्रिस्त असलेल्या वृत्रासुराचा वध करून आपले सामर्थ्य प्रकट केले.॥२॥

त्यस्य चिन्महतो निर्मृगस्य वधर्जघान तविषीभिरिन्द्रः ।

य एक इदप्रतिर्मन्यमान आदस्मादन्यो अजनिष्ट तव्यान् ॥३॥

अवाढव्य आणि हिंस्र पशूसारखा क्रूर, अहंकारी वृत्रासुराच्या घातक शक्तीचा व शस्त्रांचा इंद्रदेवांनी आपल्या आपल्या दिव्य आणि अफाट पराक्रमाच्या बळावर पुरता नाश केला. वृत्रासुरापेक्षाही अधिक बलवान आणि महाशक्ती इंद्रदेवांच्या रूपात त्यावेळी प्रकट झाली होती.॥३॥

त्यं चिदेषां स्वधया मदन्तं मिहो नपातं सुवृधं तमोगाम् ।

वृषप्रभर्मा दानवस्य भामं वज्रेण वज्री नि जघान शुष्णम् ॥४॥

सर्व प्राण्यांचे अन्न हिरावून घेऊन स्वतःच्याच मस्तीत मदांध झालेल्या, पावसाला रोखून धरणाऱ्या, तमोगुण सपन्न, शक्तिशाली बनलेल्या शुष्णासुराला, वज्रधारी आणि महापराक्रमी इंद्रदेवांनी आपल्या अमोघ वज्राने प्रहार करून पूर्णपणे नष्ट केले.॥४॥

त्यं चिदस्य क्रतुभिर्निषत्तममर्मणो विददिदस्य मर्म ।

यदीं सुक्षत्र प्रभृता मदस्य युयुत्सन्तं तमसि हर्म्ये धाः॥५॥

हे महान पराक्रमी (सुक्षत्र) इंद्रदेवा! आपण, स्वतःला मारणे अशक्य आहे असे समजणाऱ्या, लपून राहिलेल्या शत्रूचे मर्मस्थान आपल्या बुद्धीच्या बळावर शोधून काढले. सोमरसाच्या प्राशनाने उत्साही

झालेल्या आपण त्याच्याच अंधाऱ्या निवासस्थानात त्याला नेस्तनाबूत केले.॥५॥

त्यं चिदित्था कत्पयं शयानमसूर्ये तमसि वावृधानम् ।

तं चिन्मन्दानो वृषभः सुतस्योच्चैरिन्द्रो अपगूर्या जघान॥६॥

सूर्यप्रकाश नसलेल्या घोर अंधारात सुस्त पडलेल्या, सातत्याने फुगत जाणाऱ्या वृत्रासुराला, अर्पण केलेल्या सोमरसाने हर्षोल्हासित झालेल्या आणि सामर्थ्याचा वर्षाव करणाऱ्या पराक्रमी इंद्रदेवांनी आपले वज्र उगारून मोठ्या प्रहाराने ठार मारले. ॥६॥

उद्यदिन्द्रो महते दानवाय वधर्यमिष्ट सहो अप्रतीतम् ।

यदीं वज्रस्य प्रभृतौ ददाभ विश्वस्य जन्तोरधमं चकार॥७॥

जेव्हा इंद्रदेवांनी अवाढव्य दानवावर ,वृत्रासुरावर, आपले अजोड, अद्वितीय वज्र उचलले आणि त्यावर वज्राचा प्रहार करून वृत्रासुराला यमसदनास पाठवले, तेव्हा तो उन्मत्त वृत्रासुर विश्वातील सर्व प्राण्यांपेक्षा खालच्या पातळीवर आला.॥७॥

त्यं चिदर्णं मधुपं शयानमसिन्वं वव्रं मह्यादद्ग्रः ।

अपादमत्रं महता वधेन नि दुर्योण आवृणङ्मृध्रवाचम्॥८॥

प्रचंड पराक्रमी इंद्रदेवांनी, जलाला रोखून धरणाऱ्या, निसर्गातील मधुर रसांचे शोषण करणाऱ्या, स्वतःला गुहेत लपवणाऱ्या , अतृप्त,निद्रिस्त,

चरणहीन, आकारहीन, अत्यंत क्रूर आणि गर्वाने गर्जना करणाऱ्या शत्रूला, वृत्रासुराला, आपल्या महान वज्राने त्याच्याच दुर्गम निवासस्थानात कायमचे नष्ट करून टाकले .॥८॥

को अस्य शुष्मं तविषीं वरात एको धना भरते अप्रतीतः ।
इमे चिदस्य ज्रयसो नु देवी इन्द्रस्यौजसो भियसा जिहाते॥९॥

अजेय अशा इंद्रदेवांच्या पराक्रमाचा आणि बलाचा प्रतिकार कोण करू शकेल ? इंद्रदेव शत्रूंचे सर्व धन जिंकून आणतात. इंद्रदेवांच्या अजोड तेजाला घाबरून आकाश आणि पृथ्वी देखील थरथर कापतात. ॥९॥

न्यस्मै देवी स्वधितिर्जिहीत इन्द्राय गातुरुशतीव येमे ।
सं यदोजो युवते विश्वमाभिरनु स्वधाव्ने क्षितयो नमन्त॥१०॥

महान इंद्रदेवांपुढे तेजस्वी आणि स्वयंपूर्ण आकाश आपली शक्ति खाली ठेवून नतमस्तक होते. ज्याप्रमाणे एखादी प्रेमळ स्त्री आपल्या पतीसाठी स्वतःला समर्पित करते त्या प्रमाणे पृथ्वी इंद्रदेवांपुढे समर्पित होते. जेव्हा इंद्रदेव स्वतःचे अफाट तेज प्रकट करतात तेव्हा सर्व पृथ्वीवरील मानव इंद्रदेवांपुढे नतमस्तक होतात.॥१०॥

एकं नु त्वा सत्पतिं पाञ्चजन्यं जातं शृणोमि यशसं जनेषु ।
तं मे जगृभ्र आशसो नविष्ठं दोषा वस्तोर्हवमानास इन्द्रम्॥११॥

हे इंद्रदेवा ! संपूर्ण मानवलोकांमध्ये आपण एकमेव अद्वितीय, यशस्वी, कीर्तिमान आणि पाचही मानवी कुळांचे हितैषी आणि सज्जनांचे रक्षक म्हणून जन्मला आलात , असे आम्ही भक्तगण ऐकतो. म्हणूनच, आमच्या इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी आम्ही भक्तगण आपले, अत्यंत नवीन स्तुतियुक्त स्तोत्रांनी दिवस-रात्र आपले आवाहन करतो.॥११॥

(पाच मानवी कुळ: अनु, द्रुह्यु, यदु, तुर्वश आणि पुरू या पाच राजांचे वंशज)

एवा हि त्वामृतुथा यातयन्तं मघा विप्रेभ्यो ददतं शृणोमि ।

किं ते ब्रह्माणो गृहते सखायो ये त्वाया निदधुः काममिन्द्र ॥१२॥

हे इंद्रदेवा! आपण योग्य वेळी सर्व सृष्टीला संचालित करत स्तुती करणाऱ्या ज्ञानी विद्वानांना अपार धन-ऐश्वर्य दान करता असे आम्ही भक्तगण ऐकतो. आपली स्तुती करणारे, सर्व इच्छा-आकांक्षा आपल्या चरणी समर्पित करणाऱ्या विद्वानांना आपल्याकडून काय प्राप्त होते? ॥१२॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३३

ऋषि- संवरण प्राजापत्य किंवा गातुरात्रेय **देवता** – इंद्रदेव **छन्द** त्रिष्टुप्

महि महे तवसे दीध्ये नृनिन्द्रायेत्था तवसे अतव्यान् ।

यो अस्मै सुमतिं वाजसातौ स्तुतो जने समर्यश्चिकेत॥१॥

संवरण ऋषी(गातुरात्रेय ऋषि) म्हणतात, "मी स्वतः अत्यंत दुर्बल असूनही, आमच्या लोकांच्या सामर्थ्यासाठी आणि बलासाठी, परम सामर्थ्यशाली आणि महान इंद्रदेवांची माझ्या अंतःकरणातून स्तुती करतो. युद्धाच्या प्रसंगी शत्रूंचा सामना करणारे, जनसमुदाया कडून स्तुतियुक्त स्तोत्रांनी पूजले गेलेले इंद्रदेव, भक्तगणांच्या हाकेची दखल घेतात"॥१॥

स त्वं न इन्द्र धियसानो अर्कैर्हरीणां वृषन्योक्त्रमश्रेः ।

या इत्था मघवन्ननु जोषं वक्षो अभि प्रार्यः सक्षि जनान्॥२॥

हे मघवन् इंद्रदेवा! आमच्याद्वारे केल्या जाणाऱ्या स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करून आपण हरी नावाच्या अश्वांना आपल्या रथाला जुंपले. हे मनोकामना पूर्ण करणाऱ्या इंद्रदेवा ! आपल्या इच्छेनुसार हे अश्व आपल्याला युद्धभूमीवर घेऊन जातात आणि आपण आमच्या सर्व शत्रूंवर पूर्णपणे विजय मिळवता.॥२॥

न ते त इन्द्राभ्यस्मदृष्वायुक्तासो अब्रह्मता यदसन् ।
तिष्ठा रथमधि तं वज्रहस्ता रश्मिं देव यमसे स्वश्वः॥३॥
हे पराक्रमी इंद्रदेवा ! जे लोक आमच्यापेक्षा वेगळे विचार करतात आणि ज्यांच्यामध्ये भक्तीचा अभाव आहे असे आपले भक्त होऊ शकत नाहीत. हे अश्वधारी, वज्रधारी इंद्रदेवा ! आपण स्वतः नियंत्रित करत असलेल्या रथावर आरूढ होऊन आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती.॥३॥

पुरू यत्त इन्द्र सन्त्युक्था गवे चकर्थोर्वरासु युध्यन् ।
ततक्षे सूर्याय चिदोकसि स्वे वृषा समत्सु दासस्य नाम चित्॥४॥
हे शक्तिशाली इंद्रदेवा! आपण गायींसाठी (ज्ञानासाठी) आणि सुपीक भूमीवर ताबा मिळवण्यासाठी पराक्रम गाजवत होता त्यावेळी आपल्यासाठी अनेक स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण केले गेले. आपण सूर्यदेवांसाठी निश्चित निवासस्थान तयार केले आणि युद्धामध्ये सर्व शत्रूंच्या अस्तित्वाचा नाश केला.॥४॥

वयं ते त इन्द्र ये च नरः शर्धो जज्ञाना यताश्च रथाः ।
आस्माञ्जगम्यादहिशुष्म सत्वा भगो न हव्यः प्रभृथेषु चारुः॥५॥
हे इंद्रदेवा ! शत्रूंचा थरकाप उडवणारे, शूर योद्धे, पराक्रम करणारे रथावर आरूढ होऊन युद्ध भूमीवर निघालेले हे सर्व आपलेच अनुयायी आहेत. हे शत्रूचे बल शोषून घेणाऱ्या, (अहिशुष्म) ऐश्वर्य देणाऱ्या(भग) इंद्रदेवा ! आमच्या यज्ञामध्ये आणि जीवनात आम्हांला आपला आश्रय प्राप्त व्हावे ही विनंती.॥५॥

पपृक्षेण्यमिन्द्र त्वे ह्योजो नृम्णानि च नृतमानो अमर्तः ।

स न एनीं वसवानो रयिं दाः प्रार्यः स्तुषे तुविमघस्य दानम् ॥६॥

हे शत्रूंचा संहार करणारी प्रचंड शक्ती (पपृक्षेण्यम्) असलेल्या इंद्रदेवा! आपण आपल्या तेजाने संपूर्ण ब्रह्मांड व्यापून टाकावे आणि आम्हा भक्तगणांना दैदिप्यमान आणि उत्तम धन प्रदान करावे ही विनंती. अफाट ऐश्वर्याचे स्वामी असलेल्या इंद्रदेवांच्या औदार्याची आम्ही स्तुती करतो॥६॥

एवा न इन्द्रोतिभिरव पाहि गृणतः शूर कारून् ।

उत त्वचं ददतो वाजसातौ पिप्रीहि मध्वः सुषुतस्य चारोः॥७॥

हे पराक्रमी (शूर) इंद्रदेवा ! आपली स्तुतियुक्त स्तोत्रांची रचना करून गायन करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांचे आपण रक्षण करावे ही विनंती. युद्धामध्ये कवच प्रदान करणाऱ्या इंद्रदेवा, मधुर, सिद्ध झालेला सोमरस प्राशन करून आपण प्रसन्न व्हावे ही विनंती.॥७॥

उत त्ये मा पौरुकुत्स्यस्य सूरेस्त्रसदस्योर्हिरणिनो रराणाः ।

वहन्तु मा दश श्येतासो अस्य गैरिक्षितस्य क्रतुभिर्नु सश्चे॥८॥

हे इंद्रदेवा ! पुरुकुत्साचे पुत्र, गिरिक्षित वंशातील, सुवर्णाचे दान देणारे आणि अत्यंत पराक्रमी असणाऱ्या राजे त्रसदस्यू यांनी आनंदपूर्वक दिलेले ते प्रसिद्ध दहा शुभ्र अश्व आपल्याला यज्ञभूमीकडे घेऊन

जावोत. आम्ही यज्ञकर्ते भक्तगण उत्तम कर्मांनी यज्ञाचे विधी त्वरित पूर्ण करू॥८॥

उत त्ये मा मारुताश्वस्य शोणाः क्रत्वामघासो विदथस्य रातौ ।

सहस्रा मे च्यवतानो ददान आनूकमर्यो वपुषे नार्चत्॥९॥

हे इंद्रदेवा ! मारुताश्व राजाचे ते प्रसिद्ध, देखणे आणि तांबड्या रंगाचे वेगवान अश्व यज्ञाच्या प्रसंगी आपल्याला प्राप्त होवोत. उदार च्यवतान राजाने आपल्याला हजारोंची संपत्ती दान दिली असून, शरीराला सुशोभित करण्यासाठी त्याने आपल्याला आभूषणांनी सन्मानित केले आहे.॥९॥

उत त्ये मा ध्वन्यस्य जुष्टा लक्ष्मण्यस्य सुरुचो यतानाः ।

मह्ना रायः संवरणस्य ऋषेर्व्रजं न गावः प्रयता अपि ग्मन् ॥१०॥

संवरण ऋषी (गातुरात्रेय ऋषि) म्हणतात, " लक्ष्मणपुत्र ध्वन्य राजाने मला दान केलेले ते अत्यंत सुंदर, तेजस्वी आणि गतिमान अश्व माझ्याकडे आले आहेत. ज्याप्रमाणे गायी संध्याकाळी स्वतःच्या इच्छेने आपल्या गोठ्याकडे परततात, अगदी त्याचप्रमाणे हे अपार आणि महान ऐश्वर्य माझ्या, संवरण ऋषींच्या निवासस्थानी येऊन पोहोचले आहे,"॥१०॥.

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३४

ऋषि- संवरण प्राजापत्य किंवा गातुरात्रेय **देवता** – इंद्रदेव **छन्द** जगती ९ त्रिष्टुप्

अजातशत्रुमजरा स्वर्वत्यनु स्वधामिता दस्ममीयते ।

सुनोतन पचत ब्रह्मवाहसे पुरुष्टुताय प्रतरं दधातन ॥१॥

ज्यांचा कोणताही शत्रू अद्याप जन्माला आलेला नाही (अजातशत्रुम्), जे शत्रूंचा नाश करणारे आहेत अशा अद्भुत इंद्रदेवांकडे, कधीही क्षीण न होणारे (अजरा), स्वर्गीय सुख देणारे (स्वर्वती) आणि अपरिमित (अमिता) असे यज्ञातील हविष्यान्न पोहोचते. हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! महान स्तोत्रांचा स्वीकार करणाऱ्या आणि अनेक लोकांद्वारे स्तुती केल्या गेलेल्या इंद्रदेवांसाठी सोमरस सिद्ध करा, अन्न शिजवा आणि त्यांना हविष्यान्न अर्पण करा ॥१॥.

आ यः सोमेन जठरमपिप्रतामन्दत मघवा मध्वो अन्धसः ।

यदीं मृगाय हन्तवे महावधः सहस्रभृष्टिमुशना वधं यमत्॥२॥

मधुर सोमरसाच्या प्राशनाने तृप्त आणि आनंदित झालेल्या, ऐश्वर्यशाली इंद्रदेवांनी 'मृग' नामक असुराचा वध करण्यासाठी, उशना ऋषींनी तयार केलेले, हजार धारा असलेले आपले प्रचंड प्रहार करणारे वज्र उगारले.॥२॥

यो अस्मै घ्रंस उत वा य ऊधनि सोमं सुनोति भवति द्युमाँ अह ।

अपाप शक्रस्ततनुष्टिमूहति तनूशुभ्रं मघवा यः कवासखः॥३॥

जे भक्तगण कठीण परिस्थितीत किंवा समृद्धीच्या काळात इंद्रदेवांसाठी सोमरस अर्पण करतात ते भक्तगण तेजस्वी आणि भाग्यवान होतात. पापरहित, परम सामर्थ्यवान आणि ऐश्वर्यशाली इंद्रदेव, शुभकर्मे करणाऱ्या, शरीराने आणि आत्म्याने पवित्र असलेल्या विद्वान भक्तगणांना प्रगतीकडे घेऊन जातात.॥३॥

यस्यावधीत्पितरं यस्य मातरं यस्य शक्रो भ्रातरं नात ईषते ।

वेतीद्वस्य प्रयता यतंकरो न किल्बिषादीषते वस्व आकरः॥४॥

ज्या अधर्मी माणसाने आपल्या पित्याचा, मातेचा किंवा आपल्या भावाचा वध केला आहे, अशा पापी माणसाकडे शक्तिशाली इंद्रदेव पाठ फिरवतात. सृष्टीचे नियमन करणारे, धनाचे भंडार असणारे इंद्रदेव, अशा पापी माणसाने अर्पण केलेली हविष्यान्नाची आहुती स्वीकारत नाहीत.॥४॥

न पञ्चभिर्दशभिर्वष्ट्यारभं नासुन्वता सचते पुष्यता चन ।

जिनाति वेदमुया हन्ति वा धुनिरा देवयुं भजति गोमति व्रजे॥५॥

जो माणूस आपल्या पाच प्राणांनी आणि दहा इंद्रियांनी कोणतेही सत्कार्य न करता आळसात पडलेला असतो, अशा दुर्गुणी माणसाला,

कितीही श्रीमंत असला तरीही इंद्रदेव त्याला साथ न देता त्याचे सामर्थ्य हिरावून घेऊन त्याला नष्ट करतात आणि आपल्या भक्ताला धेनूंनी समृद्ध असले निवासस्थान प्रदान करतात.॥५॥

(पाच प्राण - प्राण, अपान, व्यान, उदान, समान दहा इंद्रिये - ५ ज्ञानेंद्रिये आणि ५ कर्मेंद्रिये)

वित्वक्षणः समृतौ चक्रमासजोऽसुन्वतो विषुणः सुन्वतो वृधः ।

इन्द्रो विश्वस्य दमिता विभीषणो यथावशं नयति दासमार्यः ॥६॥

रणसंग्रामात शत्रूचे दमन करणारे आणि आपल्या रथाची चक्रे वेगाने फिरवणारे इंद्रदेव, यज्ञकार्य न करणाऱ्या माणसाकडे पाठ फिरवतात, तर सत्कर्म करणाऱ्या भक्तगणांची समृद्धी वाढवतात. संपूर्ण जगावर नियंत्रण ठेवणारे आणि दुष्टांना भयभीत करणारे इंद्रदेव, आपल्या इच्छेनुसार दुष्ट प्रवृत्ती करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवतात.॥६॥

समीं पणेरजति भोजनं मुषे वि दाशुषे भजति सूनरं वसु ।

दुर्गे चन ध्रियते विश्व आ पुरु जनो यो अस्य तविषीमचुक्रुधत्॥७॥

इंद्रदेव, कंजूष व लोभी, पणीलोकांचे अन्न आणि संपत्ती सर्व बाजूंनी हिरावून घेतात आणि ते आनंददायी धन यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करतात. जे इंद्रदेवांच्या महान शक्तीला आव्हान देतात ते कठीण संकटात स्वतःला सुरक्षित ठेवू शकत नाहीत.॥७॥

सं यज्जनौ सुधनौ विश्वशर्धसाववेदिन्द्रो मघवा गोषु शुभ्रिषु ।

युजं ह्यन्यमकृत प्रवेपन्युदीं गव्यं सृजते सत्वभिर्धुनिः॥८॥

जेव्हा सर्व प्रकारच्या बलाने युक्त, पुष्कळ धन असलेल्या दोन व्यक्ती चमकदार आणि उत्कृष्ट अशा गायींवरून संघर्ष करतात तेव्हा शत्रूंचा थरकाप उडवणारे, गर्जना करणारे इंद्रदेव योग्य यज्ञकर्त्या भक्तगणांना आपला मित्र बनवतात आणि आपल्या शूर सैनिकांसह गोधन प्रदान करतात. ॥८॥

सहस्रसामाग्निवेशिं गृणीषे शत्रिमग्न उपमां केतुमर्यः ।

तस्मा आपः संयतः पीपयन्त तस्मिन्क्षत्रममवत्त्वेषमस्तु॥९॥

हे अग्निस्वरूप इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण हजारोंचे दान करणाऱ्या, सर्वांसाठी ध्वजाप्रमाणे मार्गदर्शक असणाऱ्या अग्निवेशपुत्र 'शत्रि' नावाच्या राजाची स्तुती करतो. सर्व नद्या एकत्रितपणे त्या राजाला समृद्धी, क्षात्रतेजाने परिपूर्ण करोत.॥९॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३५

ऋषि- - प्रभूवसु आङ्गिरस आत्रेय **देवता** – इंद्रदेव **छन्द** अनुष्टुप् ८ पंक्ति

यस्ते साधिष्ठोऽवस इन्द्र क्रतुष्टमा भर ।

अस्मभ्यं चर्षणीसहं सस्निं वाजेषु दुष्टरम् ॥१॥

हे इंद्रदेवा ! आपल्याकडे रक्षण करण्याची कल्याणकारी साधने आहेत. आपण आपल्याकडे असलेली सर्वोत्कृष्ट जीवनातील संघर्षात शत्रूंना पराभूत करणारी, आम्हाला विजय आणि ऐश्वर्य मिळवून देणारी, शत्रूंसाठी अजिंक्य असणारी शक्ती आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करावी ही विनंती.॥१॥

यदिन्द्र ते चतस्रो यच्छूर सन्ति तिस्रः ।

यद्वा पञ्च क्षितीनामवस्तत्सु न आ भर ॥२॥

हे इंद्रदेवा! आपल्या कडे ज्या चार दिशांना, तीन लोकांमध्ये, पाच मानवी कुळांमध्ये जे काही ऐश्वर्य आहे ते आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांसाठी घेऊन यावे ही विनंती.॥२॥

चार दिशा पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण ,

तीन लोक पृथ्वी, अंतरिक्ष आणि आकाश,

पाच कुळ अनु : रावी नदीच्या परिसरात राहणारे पराक्रमी लोक उत्तर-पश्चिम (गांधार) भागात राहणारे लोक.पुरु : सरस्वती नदीच्या तीरावर राहणारे आणि वैदिक संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे मानले गेलेले लोक.तुर्वश: दक्षिण-पूर्व भागात राहणारे लोक.यदू पश्चिम भारतात (गुजरात-राजस्थान) राहणारे लोक, ज्यांच्या वंशात पुढे भगवान श्रीकृष्ण जन्माला आले.

आ तेऽवो वरेण्यं वृषन्तमस्य हूमहे ।

वृषजूतिर्हि जज्ञिष आभूभिरिन्द्र तुर्वणिः॥३॥

हे पराक्रमाची प्रेरणा देणाऱ्या, भक्तांच्या सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या, शत्रूंचा जलद संहार करणाऱ्यां श्रेष्ठ इंद्रदेवा ! आम्ही आमच्या रक्षणासाठी आपले आवाहन करतो.॥३॥

वृषा ह्यसि राधसे जज्ञिषे वृष्णि ते शवः ।

स्वक्षत्रं ते धृषन्मनः सत्राहमिन्द्र पौंस्यम्॥४॥

हे शक्तिशाली इंद्रदेवा ! आपला जन्म आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या कार्यात यश मिळवून देण्यासाठीच झाला आहे. आपण सुखाचा वर्षाव करणारे आहात . आपले मन शत्रूंचा थरकाप उडवणारे असून शत्रूंना पराभूत करण्यास समर्थ आहे. आपला पुरुषार्थ शत्रूंचा नाश करणारा आहे .॥४॥

त्वं तमिन्द्र मर्त्यममित्रयन्तमद्रिवः ।

सर्वरथा शतक्रतो नि याहि शवसस्पते॥५॥

हे वज्रधारी, अथांग शक्तीचे स्वामी आणि शंभर यज्ञ करणाऱ्या शतक्रतो इंद्रदेवा ! जो मर्त्य मनुष्य आम्हा भक्तगणांशी शत्रुत्व बाळगतो त्यांच्यावर आपण आपल्या संपूर्ण रथांच्या शक्तीनिशी आक्रमण करावे आणि त्यांना पराभूत करावे ही विनंती.॥५॥

त्वामिद्वृत्रहन्तम जनासो वृक्तबर्हिषः ।

उग्रं पूर्वीषु पूर्व्यं हवन्ते वाजसातये ॥६॥

हे वृत्रासुराचा नाश करणाऱ्या, उग्र रूप धारण करणाऱ्या इंद्रदेवा ! यज्ञवेदीवर पवित्र कुशाचे आसन पसरणारे यज्ञकर्ते भक्तगण अन्नाचा लाभ आणि युद्धात विजय मिळवण्यासाठी प्राचीन काळापासून आपलेच आवाहन करतात. ॥६॥

अस्माकमिन्द्र दुष्टरं पुरोयावानमाजिषु ।

सयावानं धनेधने वाजयन्तमवा रथम्॥७॥

हे इंद्रदेवा ! युद्धाच्या प्रसंगी नेहमी अग्रेसर राहणाऱ्या, शत्रूंना पराभूत करण्यास अत्यंत कठीण असणाऱ्या, सहकाऱ्यांसह एकत्र पुढे जाणाऱ्या आणि प्रत्येक युद्धात विजय व समृद्धी मिळवण्यासाठी वेगाने धावणाऱ्या आमच्या रथाचे आपण रक्षण करावे ही विनंती.॥७॥

अस्माकमिन्द्रेहि नो रथमवा पुरंध्या ।

वयं शविष्ठ वार्यं दिवि श्रवो दधीमहि दिवि स्तोमं मनामहे ॥८॥

हे परम शक्तिशाली इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांकडे यावे आणि आपल्या दिव्य बुद्धीने आमच्या रथाचे रक्षण करावे ही विनंती. आपल्या कृपेने आम्ही आकाशापर्यंत पोहोचणारी श्रेष्ठ कीर्ती प्राप्त करू आणि दररोज आपल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे चिंतन करू॥८॥.

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३६

ऋषि- - प्रभूवसु आङ्गिरस आत्रेय **देवता** – इंद्रदेव **छन्द** त्रिष्टुप् ३ जगती

स आ गमदिन्द्रो यो वसूनां चिकेतद्दातुं दामनो रयीणाम् ।

धन्वचरो न वंसगस्तृषाणश्चकमानः पिबतु दुग्धमंशुम्॥१॥

सर्व संपत्तीचे, ऐश्वर्याचे स्वामी असलेले, धनाचा योग्य विनियोग करणारे इंद्रदेव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या यज्ञामध्ये आगमन करोत. ज्याप्रमाणे वाळवंटात तहानलेला वृषभ पाण्यासाठी व्याकुळ होतो, त्याप्रमाणे सोमरस प्राशन करण्याची तीव्र इच्छा बाळगणारे तहानलेले इंद्रदेव यज्ञामधील दुग्ध मिश्रित सोमरसाचे प्राशन करोत ही विनंती॥१॥

आ ते हनू हरिवः शूर शिप्रे रुहत्सोमो न पर्वतस्य पृष्ठे ।

अनु त्वा राजन्नर्वतो न हिन्वन्गीर्भिर्मदेम पुरुहूत विश्वे॥२॥

हे हरी नावाच्या अश्वांचे स्वामी, पराक्रमी इंद्रदेवा ! पर्वतावरील शिखरावर चढणाऱ्या ढगाप्रमाणे हा पवित्र सोमरस आपल्या सुंदर मुखात प्रवेश करो. हे अनेकांद्वारे आळवल्या जाणाऱ्या (पुरुहूत) इंद्रदेवा ! ज्याप्रमाणे वेगवान धावणाऱ्या अश्वांना उत्तम अन्नाने तृप्त

केले जाते त्याप्रमाणे आम्ही भक्तगण आमच्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपल्याला तृप्त करू देत .॥२॥

चक्रं न वृत्तं पुरुहूत वेपते मनो भिया मे अमतेरिदद्रिवः ।
रथादधि त्वा जरिता सदावृध कुविन्नु स्तोषन्मघवन्पुरूवसुः॥३॥

हे वज्रधारी (अद्रिवः) आणि अनेक भक्तांनी आवाहन केलेल्या इंद्रदेवा ! ज्ञानाच्या कमतरतेमुळे आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे मन डळमळीत होत आहे. हे सदैव वृद्धी करणाऱ्या (सदावृध) आणि ऐश्वर्य देणाऱ्या मघवन इंद्रदेवा ! आपण रथावर आरूढ आहात हे जाणून आपले भक्त पुरूवसु ऋषी आपली भरभरून स्तुती करत आहेत.॥३॥

एष ग्रावेव जरिता त इन्द्रेयर्ति वाचं बृहदाशुषाणः ।
प्र सव्येन मघवन्यंसि रायः प्र दक्षिणिद्धरिवो मा वि वेनः॥४॥

हे इंद्रदेवा ! सोमरस काढण्याच्या पाषाणाप्रमाणे, स्तुतिपाठक मोठ्या फळाच्या अपेक्षेने आपली स्तुतियक्त स्तोत्रांनी स्तुती करत आहेत. हे हरी अश्वांचे स्वामी, मघवन् इंद्रदेवा ! आपण डाव्या आणि उजव्या हाताने संपत्ती प्रदान करत आम्हा भक्तगणांवर कृपादृष्टी ठेवावी आणि आम्हाला कधीही विन्मुख ठेवू नका ही विनंती.॥४॥

वृषा त्वा वृषणं वर्धतु द्यौर्वृषा वृषभ्यां वहसे हरिभ्याम् ।
स नो वृषा वृषरथः सुशिप्र वृषक्रतो वृषा वज्रिन्भरे धाः॥५॥

हे सुखाचा वर्षाव करणाऱ्या पराक्रमी इंद्रदेवा ! आपल्यासारखे समृद्धी देणाऱ्या देवतांचे सामर्थ्य वाढो. आपण हरी नावाचे अश्व जोडलेल्या रथावर आरूढ होऊन आमच्या यज्ञस्थळी येता. हे सुंदर हनुवटी असणाऱ्या (सुशिप्र), सामर्थ्यशाली कर्मे करणाऱ्या, (वृषक्रतो) वज्रधारी इंद्रदेवा ! आपण युद्धाच्या प्रसंगी आमचे रक्षण करावे ही विनंती.॥५॥

यो रोहितौ वाजिनौ वाजिनीवान्त्रिभिः शतैः सचमानावदिष्ट ।

यूने समस्मै क्षितयो नमन्तां श्रुतरथाय मरुतो दुवोया॥६॥

हे मरुद्गणांनो! समृद्धीचे स्वामी असलेल्या 'श्रुतरथ' राजाने तीनशे गायींसह वेगाने धावणारे तांबड्या रंगाचे दोन उत्तम अश्व आम्हाला दान दिले आहेत, त्या युवा राजा श्रुतरथच्या सेवेसाठी आणि आदरासाठी सर्व प्रजेने नतमस्तक व्हावे.॥६॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३७

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – इंद्रदेव **छन्द** त्रिष्टुप्

सं भानुना यतते सूर्यस्याजुह्वानो घृतपृष्ठः स्वञ्चाः ।

तस्मा अमृध्रा उषसो व्युच्छान्य इन्द्राय सुनवामेत्याह॥१॥

उत्तम मार्ग दाखवणारे, घृताची आहुती स्वीकारणारे अग्निदेव, सूर्यदेवांच्या तेजाशी चांगल्या प्रकारे जोडले जातात. जे यज्ञकर्ते भक्तगण संकल्प करून म्हणतात ,"आम्ही इंद्रदेवांसाठी सोमरस सिद्ध करून यज्ञ करू" त्या भक्तगणांसाठी कधी नष्ट न होणारी अहिंसक उषादेवता अंधार दूर करून प्रकाशमान होते ॥१॥

समिद्धाग्निर्वनवत्स्तीर्णबर्हिर्युक्तग्रावा सुतसोमो जराते ।

ग्रावाणो यस्येषिरं वदन्त्ययदध्वर्युर्हविषाव सिन्धुम्॥२॥

जे यज्ञकर्ते भक्तगण अग्निदेवांना प्रदीप्त करतात, यज्ञ वेदीवर पवित्र दर्भ पसरवतात, पाषाणाच्या मदतीने सोमरस सिद्ध करतात असे भक्तगण स्तोत्रांचे पठण करतात. ज्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या सोमरस सिद्ध करण्याच्या पाषाणातून मधुर नाद निघत आहे असे भक्तगण हविष्यान्नाची आहुती देऊन शुद्धीकरणासाठी नदीच्या पात्रात स्नान करण्यासाठी जातात.॥२॥

वधूरियं पतिमिच्छन्त्येति य ईं वहाते महिषीमिषिराम् ।
आस्य श्रवस्याद्रथ आ च घोषात्पुरू सहस्रा परि वर्तयाते॥३॥
आपल्या पतीवर नितांत प्रेम करणाऱ्या, चैतन्यमयी नववधूला आपल्या निवासस्थानी आदराने घेऊन येणाऱ्या पतीला, मोठ्याने गर्जना करत फिरणारा इंद्रदेवांचा रथ, विपुल कीर्ती, हजारो प्रकारचे ऐश्वर्य व धन-संपत्ती घेऊन येवो ॥३॥.

न स राजा व्यथते यस्मिन्निन्द्रस्तीव्रं सोमं पिबति गोसखायम् ।
आ सत्वनैरजति हन्ति वृत्रं क्षेति क्षितीः सुभगो नाम पुष्यन्॥४॥
ज्या राजाच्या यज्ञामध्ये इंद्रदेव गायींच्या शुद्ध दुधात सिद्ध केलेला सोमरस प्राशन करतात तो राजा कधीही दुःखी होत नाही. तो राजा आपल्या पराक्रमी वीरांच्या साहाय्याने वृत्रासुरासारख्या शत्रूंना पळवून लावून त्यांचा नाश करतो, आपल्या प्रजेचे पालन करतो, कीर्ती मिळवतो आणि पृथ्वीवर सुखाने राज्य करतो.॥४॥

पुष्यात्क्षेमे अभि योगे भवात्युभे वृतौ संयती सं जयाति ।
प्रियः सूर्ये प्रियो अग्ना भवाति य इन्द्राय सुतसोमो ददाशत्॥५॥
जे यज्ञकर्ते भक्तगण इंद्रदेवांसाठी सोमरस सिद्ध करून अर्पण करतात ते भक्तगण मिळवलेल्या गोष्टींचे रक्षण करत (क्षेमे) आणि नवीन गोष्टी मिळवत(योगे) समृद्धी प्राप्त करतात. असे भक्तगण युद्धाच्या मैदानात समोरासमोर आलेल्या शत्रूंच्या सैन्याविरुद्ध विजय मिळवतात. असे भक्तगण इंद्रदेवांचे आणि सूर्यदेवांचे अत्यंत प्रिय होतात.॥५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३८

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – इंद्रदेव **छन्द** अनुष्टुप्

उरोष्ट इन्द्र राधसो विभ्वी रातिः शतक्रतो ।

अधा नो विश्वचर्षणे द्युम्ना सुक्षत्र मंहय॥१॥

हे शंभर यज्ञ करणाऱ्या (शतक्रतो) इंद्रदेवा! आपले वैभव आणि दान अत्यंत महान आहे. हे विश्वाचे रक्षण करणाऱ्या श्रेष्ठ वीरा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांवर कृपा आणि ऐश्वर्य प्रदान करावे ही विनंती॥१॥

यदीमिन्द्र श्रवाय्यमिषं शविष्ठ दधिषे ।

पप्रथे दीर्घश्रुत्तमं हिरण्यवर्ण दुष्टरम् ॥२॥

हे अत्यंत बलशाली इंद्रदेवा ! आपण अत्यंत प्रसिद्ध, जीवनाचे पोषण करणारे जे अन्न आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करता, ते सोन्यासारखे, दैदिप्यमान, पराभूत न होणारे, कीर्ती पसरवणारे अन्न आमची शक्ती वृद्धिंगत करते.॥२॥

शुष्मासो ये ते अद्रिवो मेहना केतसापः ।

उभा देवावभिष्टये दिवश्च ग्मश्च राजथः॥३॥

हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपल्याकडे बलशाली, दिव्य ज्ञानाने अंतराळाला स्पर्श करणाऱ्या मरुद्गणांच्या शक्ती आहेत. आपल्या या अद्भुत सामर्थ्याने आपण दोघेही आम्हा भक्तगणांच्या रक्षणासाठी आकाशलोक आणि पृथ्वीलोकांवर राज्य करता. ॥३॥

उतो नो अस्य कस्य चिद्दक्षस्य तव वृत्रहन् ।

अस्मभ्यं नृम्णमा भरास्मभ्यं नृमणस्यसे॥४॥

हे वृत्रासुर संहारक इंद्रदेवा ! आपण आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे कल्याण इच्छिता. आपण आपल्या सामर्थ्याने बलवान शत्रूंचे ऐश्वर्य आम्हाला मिळवून द्यावे ही विनंती.॥४॥

नू त आभिरभिष्टिभिस्तव शर्मञ्छतक्रतो ।

इन्द्र स्याम सुगोपाः शूर स्याम सुगोपाः॥५॥

हे शंभर यज्ञ करणाऱ्या (शतक्रतो) इंद्रदेवा! आपल्या कल्याणकारी रक्षणाच्या मदतीने आम्ही यज्ञकर्ते भक्तगण उत्तम प्रकारे सुरक्षित राहू. आपल्या कृपेमुळेच आम्ही सदैव सुरक्षित आणि निर्भय राहू.॥५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-३९

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – इंद्रदेव **छन्द** अनुष्टुप् ५ पंक्ति

यदिन्द्र चित्र मेहनास्ति त्वादातमद्रिवः ।

राधस्तन्नो विदद्वस उभयाहस्त्या भर ॥१॥

हे वज्रधारी इंद्रदेवा! आपल्याकडे अद्भुत विविधांगी आणि श्रेष्ठ असे दान देण्यायोग्य ऐश्वर्य आहे. हे ज्ञानी इंद्रदेवा ! आपण ते ऐश्वर्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना आपल्या दोन्ही हातांनी भरभरून द्यावे ही विनंती.॥१॥

यन्मन्यसे वरेण्यमिन्द्र द्युक्षं तदा भर ।

विद्याम तस्य ते वयमकूपारस्य दावने ॥२॥

हे इंद्रदेवा! जे ऐश्वर्य आपण अत्यंत श्रेष्ठ आणि दिव्य मानता, ते ऐश्वर्य आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना प्रदान करावे ही विनंती. आपल्या अमर्याद धनाचा स्वीकार करण्यास आम्ही पात्र ठरावे.॥२॥

यत्ते दित्सु प्रराध्यं मनो अस्ति श्रुतं बृहत् ।

तेन दृळ्हा चिदद्रिव आ वाजं दर्षि सातये॥३॥

हे वज्रधारी इंद्रदेवा ! आपले दानशूर मन महान, सुप्रसिद्ध आणि स्तुतीस पात्र आहे. आपल्या त्या उदार मनाने कठीण अडथळ्यांना पार करून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांना समृद्धी प्रदान करावी ही विनंती. ॥३॥

मंहिष्ठं वो मघोनां राजानं चर्षणीनाम् ।

इन्द्रमुप प्रशस्तये पूर्वीभिर्जुजुषे गिरः ॥४॥

ऐश्वर्यशाली दात्यांमध्ये सर्वात जास्त दानशूर, संपूर्ण मानवजातीचा राजा असलेल्या इंद्रदेवाच्या जवळ जाऊन आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्राचीन काळापासून चालत आलेल्या स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करतो. त्या स्तुतींचा इंद्रदेव आनंदाने स्वीकार करतात.॥४॥

अस्मा इत्काव्यं वच उक्थमिन्द्राय शंस्यम् ।

तस्मा उ ब्रह्मवाहसे गिरो वर्धन्त्यत्रयो गिरः शुम्भन्त्यत्रयः॥५॥

इंद्रदेवासाठीच अत्री ऋषींच्या वंशजांनी ह्या ज्ञानयुक्त काव्यमय, सुंदर शब्दांनी सुशोभित, स्तुतियुक्त स्तोत्रांची रचना केली आहे. अत्री ऋषींचे वंशज स्तुतिप्रिय आणि प्रार्थनांचा स्वीकार करणाऱ्या इंद्रदेवासाठी या स्तोत्रांचे पठण करतात॥५॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४०

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – इंद्र ५ सूर्य ; ६-९ अत्रि

छन्द १-३ उष्णिक् ; ५, ९ अनुष्टुप् , ४, ६-८त्रिष्टुप्

या सुक्ता मध्ये इसवीसन पूर्व झालेल्या सूर्य ग्रहणाची माहिती आहे

आ याह्यद्रिभिः सुतं सोमं सोमपते पिब ।

वृषन्निन्द्र वृषभिर्वृत्रहन्तम॥१॥

हे सोमरसाचे स्वामी, कामना पूर्ण करणारे आणि वृत्रासुराचा वध करणाऱ्यांमध्ये सर्वश्रेष्ठ, शक्तिशाली इंद्रदेवा ! दगडांनी वाटून तयार केलेला हा पवित्र सोमरस प्राशन करण्यासाठी आपण आपल्या बलशाली सहकाऱ्यांसह येथे आगमन करावे ही विनंती.॥१॥.

वृषा ग्रावा वृषा मदो वृषा सोमो अयं सुतः ।

वृषन्निन्द्र वृषभिर्वृत्रहन्तम॥२॥

हे वृत्रासुरहंता, सामर्थ्यवान इंद्रदेवा ! सोमरस सिद्ध करण्यासाठी वापरलेले दगड, त्यामुळे सिद्ध होणारा सोमरस, सोमरस प्राशन करून येणारा मदमस्त उत्साह वर्धक आनंददायी आहे. हे इंद्रदेवा ! आपण आपल्या पराक्रमी वीरांसह सोमरस प्राशन करावा ही विनंती.॥२॥.

वृषा त्वा वृषणं हुवे वज्रिञ्चित्राभिरूतिभिः ।

वृषन्निन्द्र वृषभिर्वृत्रहन्तम॥३॥

हे वृत्रासुरहंता, सामर्थ्यवान इंद्रदेवा ! आम्ही यज्ञकर्ते भक्तगण आपल्या विविध प्रकारच्या रक्षण करणाऱ्या शक्तिशाली स्वरूपाचे आवाहन करतो. हे इंद्रदेवा ! आपण आपल्या पराक्रमी वीरांसह सोमरस प्राशन करावा ही विनंती.॥३॥

ऋजीषी वज्री वृषभस्तुराषाट् छुष्मी राजा वृत्रहा सोमपावा ।

युक्त्वा हरिभ्यामुप यासदर्वाङ्माध्यंदिने सवने मत्सदिन्द्रः॥४॥

सोमरसाचा आस्वाद घेणारे , वज्रधारी , भक्तांवर सुखाचा वर्षाव करणारे , शत्रूंना वेगाने पराभूत करणारे , अत्यंत पराक्रमी, वृत्रासुरहंता, सोमरस प्राशन करणारे इंद्रदेव आपले हरी नावाचे दोन्ही वेगवान अश्व रथाला जोडून आमच्या यज्ञस्थळी येवोत आणि यज्ञाच्या माध्यंदिन सत्रात सोमरस प्राशन करून प्रसन्न होवोत.॥४॥

यत्त्वा सूर्य स्वर्भानुस्तमसाविध्यदासुरः ।

अक्षेत्रविद्यथा मुग्धो भुवनान्यदीधयुः ॥५॥

हे सूर्यदेवा! जेव्हा स्वर्भानु नावाच्या असुराने आपल्या अंधकाराने आपल्याला झाकून टाकले, तेव्हा संपूर्ण जगातील प्राणी दिशाहीन

झालेल्या एखाद्या गोंधळलेल्या माणसाप्रमाणे अगतिक होऊन आपल्याकडे पाहत राहिले॥५॥

या ऋचेत पहिल्यांदा सूर्यग्रहणाचा उल्लेख आहे. विद्वानांच्या मते हे पूर्ण सूर्यग्रहण २२ ऑक्टोबर ४२०२ ईसापूर्व (BC) किंवा १९ ऑक्टोबर ३८११ ईसापूर्व (BC) या काळात झाले असावे

स्वर्भानोरध यदिन्द्र माया अवो दिवो वर्तमाना अवाहन् ।

गूळ्हं सूर्यं तमसापव्रतेन तुरीयेण ब्रह्मणाविन्ददत्रिः॥६॥

हे इंद्रदेवा ! जेव्हा आपण आकाशात सूर्याच्या खाली पसरलेली स्वर्भानु असुराची मायावी शक्ती नष्ट केलीत, तेव्हा स्वाभाविक नियमांच्या विरुद्ध असलेल्या त्या भयानक अंधकारात लपलेल्या सूर्यदेवांना, महर्षी अत्रींनी आपल्या चौथ्या पवित्र मंत्राच्या ज्ञानाद्वारे पुन्हा शोधून काढले.॥६॥

मा मामिमं तव सन्तमत्र इरस्या द्वग्धो भियसा नि गारीत् ।

त्वं मित्रो असि सत्यराधास्तौ मेहावतं वरुणश्च राजा॥७॥

सूर्यदेव अत्रीऋषींना म्हणाले , "ह्या द्रोह करणाऱ्या शत्रूने (स्वर्भानु असुराने) द्वेषाने आणि भयावह अंधाराने मला पूर्णपणे गिळून टाकू नये यासाठी मी आपल्या आश्रयाला आलो आहे. तुम्ही माझे कल्याण करणारे मित्र आहात. तुम्ही आणि वरुणदेव या दोघांनी मिळून या संकटात माझे रक्षण करावे."॥७॥

ग्राव्णो ब्रह्मा युयुजानः सपर्यन्कीरिणा देवान्नमसोपशिक्षन् ।

अत्रिः सूर्यस्य दिवि चक्षुराधात्स्वर्भानोरप माया अघुक्षत् ॥८॥

सोमरस तयार करणाऱ्या पाषाणांना यज्ञात सिद्ध करून, स्तोत्रांद्वारे, आदरपूर्वक नतमस्तक होऊन, ब्रह्मत्व धारण केलेल्या श्रेष्ठ अत्रीऋषींनी सूर्यदेवांच्या नेत्ररूप तेजाला पुन्हा आकाशात प्रस्थापित केले आणि स्वर्भानु असुराची अंधकारमय माया पूर्णपणे नष्ट करून टाकली.॥८॥

यं वै सूर्यं स्वर्भानुस्तमसाविध्यदासुरः ।

अत्रयस्तमन्वविन्दन्नह्यन्ये अशक्नुवन्॥९॥

ज्या सूर्यदेवांना स्वर्भानु नावाच्या असुराने अंधकाराने पूर्णपणे झाकून टाकले होते, त्या अंधकारात हरवलेल्या सूर्यदेवांना अत्रिऋषींनी आपल्या ज्ञानाने पुन्हा शोधून काढले, असे सामर्थ्य इतर कोणाकडे ही नव्हते.॥९॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४१

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – विश्वेदेवा

छन्द त्रिष्टुप् ; १६ - १ ७ अतिजगती; २० एकपदा विराट्

को नु वां मित्रावरुणावृतायन्दिवो वा महः पार्थिवस्य वा दे ।
ऋतस्य वा सदसि त्रासीथां नो यज्ञायते वा पशुषो न वाजान् ॥१॥

हे मित्रदेवांनो आणि वरुणदेवांनो ! आपल्यासाठी यज्ञ करण्याची इच्छा असणारा कोण आहे? आपण दोघेही आकाशलोकात, पृथ्वीलोकात, अंतरिक्षात किंवा यज्ञस्थळी राहून आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करता. आपण आम्हा यज्ञकर्त्यांना विपुल अन्न, समृद्धी आणि पुष्ट पशुधन प्रदान करावे ही विनंती॥१॥

ते नो मित्रो वरुणो अर्यमायुरिन्द्र ऋभुक्षा मरुतो जुषन्त ।
नमोभिर्वा ये दधते सुवृक्तिं स्तोमं रुद्राय मीळ्हुषे सजोषाः॥२॥

हे मित्रदेव, वरुणदेव, अर्यमा, वायुदेव, इंद्रदेव, ऋभुदेव, वायुदेव या सर्व देवांनो आपण आमच्यावर प्रसन्न व्हावे ही विनंती. फळ देणाऱ्या रुद्रदेवांसाठी आम्ही यज्ञकर्ते भक्तगण नतमस्तक होऊन आनंदाने पवित्र, स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करत आहोत त्याचा रुद्रदेवांनी स्वीकार करावा ही विनंती.॥२॥

आ वां येष्ठाश्विना हुवध्यै वातस्य पत्मन्नथ्यस्य पुष्टौ ।

उत वा दिवो असुराय मन्म प्रान्धांसीव यज्यवे भरध्वम् ॥३॥

हे सर्वश्रेष्ठ अश्विनीकुमारानो ! वायूच्या वेगाने धावणाऱ्या रथातून, आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांच्या समृद्धीसाठी आम्ही, आपण दोघांना आमच्या यज्ञ स्थळी येण्याची विनंती करतो. हे यज्ञकर्त्यांनो ! तुम्ही स्वर्गातील त्या शक्तीशाली देवतांना सुंदर स्तोत्रे आणि हविष्यान्नाची आहुती अर्पण करावी.॥३॥

प्र सक्षणो दिव्यः कण्वहोता त्रितो दिवः सजोषा वातो अग्निः ।

पूषा भगः प्रभृथे विश्वभोजा आजिं न जग्मुराश्वश्वतमाः॥४॥

कण्वऋषींच्या वंशातील ऋषींनी संपन्न केलेल्या यज्ञात त्रितदेव, (अंतराळाचे किंवा पाण्याचे अधिष्ठाता मानले जातात) वायुदेव आणि अग्निदेव एकत्र येऊन प्रसन्न व्हावेत. विश्वाचे पालन पोषण करणारे पूषन् देव,आणि भगदेव, अत्यंत वेगवान अश्व असणाऱ्या रथातून युद्धाच्या मैदानात धावणाऱ्या रथाप्रमाणे आम्हा भक्तगणांच्या सुसज्ज यज्ञस्थळी अत्यंत वेगाने धावून येवोत ही विनंती.॥४॥

प्र वो रयिं युक्ताश्वं भरध्वं राय एषेऽवसे दधीत धीः ।

सुशेव एवैरौशिजस्य होता ये व एवा मरुतस्तुराणाम्॥५ ॥

हे मरुद्गणांनो ! आपण आपल्या अश्वांनी युक्त असलेले ऐश्वर्य आम्हा भक्तगणांना प्राप्त करून द्यावे ही विनंती. उशिज ऋषींचे पुत्र

ज्याप्रमाणे यज्ञात मुख्य यज्ञकर्ता बनून कल्याणकारी मार्गाने देवांची आराधना करत ऐश्वर्य प्राप्त करतात. त्याप्रमाणे वेगाने धावणाऱ्या, मरुद्गणांमुळे आम्हा भक्तगणांचे रक्षण होवो आणि आम्हाला सुख लाभो ही विनंती.॥५॥

प्र वो वायुं रथयुजं कृणुध्वं प्र देवं विप्रं पनितारमर्कैः ।

इषुध्यव ऋतसापः पुरंधीर्वस्वीर्नो अत्र पत्नीरा धिये धुः॥६॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही आपल्या स्तुतियुक्त स्तोत्रांनी वेगवान रथावर आरूढ झालेल्या स्तुती करण्यास योग्य वायूदेवांचे आवाहन करा. तसेच सत्याचे पालन करणाऱ्या, कल्याण करणाऱ्या आणि समृद्धी देणाऱ्या देवपत्नी भक्तगणांच्या यज्ञामध्ये अवतरित होवोत.॥६॥

उप व एषे वन्द्योभिः शूषैः प्र यह्वी दिवश्चितयद्भिरर्कैः ।

उषासानक्ता विदुषीव विश्वमा हा वहतो मर्त्याय यज्ञम्॥७॥

हे आकाशलोकातील पूजनीय आणि सामर्थ्यवान उषादेवते आणि रात्रदेवते आम्ही यज्ञकर्ते भक्तगण, ज्ञानदायी स्तुतियुक्त स्तोत्रांनी आपली प्रार्थना करतो. सर्व काही जाणणाऱ्या दोन विदुषींप्रमाणे आपण, मर्त्य भक्तगणांच्या यज्ञाचे फळ घेऊन यावे ही विनंती.॥७॥

अभि वो अर्चे पोष्यावतो नृन्वास्तोष्पतिं त्वष्टारं रराणः ।

धन्या सजोषा धिषणा नमोभिर्वनस्पतीँरोषधी राय एषे॥८॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण प्रसन्न मनाने पोषण करणाऱ्या दिव्यशक्तींची स्तुती करतो. आम्ही वास्तूचे रक्षक असलेल्या (वास्तोष्पति),सृष्टीचे शिल्पकार 'त्वष्टा' देवा, धन देणाऱ्या धिषणा देवता बरोबर निवास करणाऱ्या सर्व वनस्पती आणि औषधी यांची आम्हा भक्तगणांना ऐश्वर्य आणि समृद्धी प्राप्ती व्हावी यासाठी स्तुती करतो.॥८॥

तुजे नस्तने पर्वताः सन्तु स्वैतवो ये वसवो न वीराः ।

पनित आप्त्यो यजतः सदा नो वर्धान्नः शंसं नर्यो अभिष्टौ ॥९॥

वीर पुरुषांप्रमाणे या जगाचे पालनपोषण करणारे आणि स्वतःच्या गतीने चालणारे मेघ आम्हा भक्तगणांच्या पुत्रापौत्रांच्या (तने) समृद्धीसाठी (तुजे) उपस्थित असोत. जलदेवतेप्रमाणे (आप्त्यो) पूजनीय, मानवाचे कल्याण करणारे देव भक्तगणांच्या प्रार्थनांनी प्रसन्न होऊन आम्हाला समृद्ध करोत ही विनंती.॥९॥

वृष्णो अस्तोषि भूम्यस्य गर्भं त्रितो नपातमपां सुवृक्ति ।

गृणीते अग्निरेतरी न शूषैः शोचिष्केशो नि रिणाति वना॥१०॥

आम्ही भक्तगण पृथ्वीचा गर्भ असणाऱ्या, पाऊस पडणाऱ्या, पाण्याचे रक्षण करणाऱ्या, सामर्थ्यवान अग्निदेवांची अत्यंत पवित्र आणि उत्तम स्तोत्रांनी स्तुती करत आहोत. त्रिविध स्थानांत सर्वत्र गमनशील

अग्निदेव आपल्या तेजस्वी ज्वाळारूपी केसांनी वनांना पूर्णपणे भस्मसात करतात॥१०॥

कथा महे रुद्रियाय ब्रवाम कद्राये चिकितुषे भगाय ।

आप ओषधीरुत नोऽवन्तु द्यौर्वना गिरयो वृक्षकेशाः॥११॥

अत्री कुळातील ऋषीमुनी विचारतात,"आम्ही त्या महान रुद्रपुत्रांची कशा प्रकारे स्तुती करावी? धनाचा मार्ग जाणणाऱ्या आणि सर्वज्ञ अशा भगदेवतेची आम्ही कशी प्रार्थना करावी? जल, औषधी वनस्पती, आकाश, वने आणि वृक्षरूपी दाट केस असलेले हे पर्वत आमचे सर्व बाजूंनी रक्षण करोत.॥११॥

शृणोतु न ऊर्जां पतिर्गिरः स नभस्तरीयाँ इषिरः परिज्मा ।

शृण्वन्त्वापः पुरो न शुभ्राः परि स्रुचो बबृहाणस्याद्रेः॥१२॥

अंतरिक्षात राहणारे, सर्वव्यापी, गतिमान आणि संकटांतून पार करणारे शक्तीचे स्वामी (वायुदेव) आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची प्रार्थना श्रवण करोत ही विनंती. ज्या प्रमाणे मेघांतून पांढरेशुभ्र, पवित्र जल वेगाने स्रुवांमध्ये भरून सर्वत्र वाहते त्याप्रमाणे जलदेवतेने आमच्या प्रार्थना श्रवण कराव्यात ही विनंती.॥१२॥

विदा चिन्नु महान्तो ये व एवा ब्रवाम दस्मा वार्यं दधानाः ।

वयश्चन सुभ्व आव यन्ति क्षुभा मर्तमनुयतं वधस्नैः ॥१३॥

हे महान मरुद्गणांनो ! आपण आम्हा भक्तगणांच्या स्तुती व प्रार्थना त्वरित जाणून घ्याव्यात . हे दर्शनीय देवतानो , आम्ही आपले उपासक उत्तम हविष्यान्न धारण करून आपली प्रार्थना करत आहोत. ज्याप्रमाणे वेगवान पक्षी सुद्धा (वयः चन) झेप घेतात त्याप्रमाणे हे मरुद्गणांनो ! आपण आमच्यावर अनुकूल भाव ठेवून आमच्याकडे यावे आणि आम्हाला त्रास देणाऱ्या मानवी शत्रूंचा आपल्या शस्त्रास्त्रांनी (वधस्नैः) वध करून आमच्याजवळ उपस्थित राहावे ही विनंती.॥१३॥

आ दैव्यानि पार्थिवानि जन्मापश्चाच्छा सुमखाय वोचम् ।
वर्धन्तां द्यावो गिरश्चन्द्राग्रा उदा वर्धन्तामभिषाता अर्णाः॥१४॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण दिव्यगुणांनी युक्त पृथ्वी वरील उत्पन्न झालेल्या सृष्टीचे तसेच अत्यंत आनंद देणाऱ्या जलाचे उत्तम प्रकारे वर्णन करतो. आमची चंद्राप्रमाणे आनंद देणारी वाणी(गिरश्चन्द्राग्रा) सदैव वृद्धिंगत होवो, तसेच चहूबाजूंनी वाहणारे पाण्याचे सर्व प्रवाह भरून जावोत. ॥१४॥

पदेपदे मे जरिमा नि धायि वरूत्री वा शक्रा या पायुभिश्च ।
सिषक्तु माता मही रसा नः स्मत्सूरिभिर्ऋजुहस्त ऋजुवनिः॥१५॥

आम्ही भक्तगण प्रत्येक क्षणी शक्तिशाली, स्वतःच्या संरक्षण साधनांनी युक्त असलेल्या, आमचे रक्षण करणाऱ्या विशाल

धरणीमातेची स्तुती करतो. विशाल धरणीमाता समृद्धी देणाऱ्या नदीप्रमाणे, ज्ञानी लोकांसह आपल्या उदार हाताने आम्हाला वरदान देवो ही विनंती.॥१५॥

कथा दाशेम नमसा सुदानूनेवया मरुतो अच्छोक्तौ प्रश्रवसो मरुतो अच्छोक्तौ ।

मा नोऽहिर्बुध्न्यो रिषे धादस्माकं भूदुपमातिवनिः॥१६॥

आम्ही यज्ञकर्त्या भक्तगणांनी उत्तम दान देणाऱ्या, गतिमान असणाऱ्या मरुद्गणांची स्तुती कशी करावी ? त्यांची उत्तम प्रार्थनेने कशी पूजा करावी ? अथांग निसर्गातील सुप्त आणि अथांग शक्तीने (अहिर्बुध्न्य) आम्हा भक्तगणांना कोणत्याही संकटात न टाकता, रक्षण करून आमच्या शत्रूंचा नाश करावा ही विनंती.॥१६॥

इति चिन्नु प्रजायै पशुमत्यै देवासो वनते मर्त्यो व आ देवासो वनते मर्त्यो वः ।

अत्रा शिवां तन्वो धासिमस्या जरां चिन्मे निर्ऋतिर्जग्रसीत॥१७॥

हे देवतांनो! आम्ही मर्त्य भक्तगण संतती आणि गायी-वासरांनी समृद्ध अशा संपत्तीसाठी आपल्याकडे याचना करतो. आमच्या या संसारात शरीराला कल्याणकारी अन्न मिळो, आमच्या आयुष्यातील अकाली वृद्धत्व किंवा मृत्यु (निर्ऋती :मृत्यूची देवता) संपूर्णपणे नष्ट होवो ही विनंती.॥१७॥

तां वो देवाः सुमतिमूर्जयन्तीमिषमश्याम वसवः शसा गोः ।

सा नः सुदानुर्मृळयन्ती देवी प्रति द्रवन्ती सुविताय गम्याः ॥१८॥

हे तेजस्वी, समृद्धी देणाऱ्या वसूंनो आम्हा भक्तगणांना गायींच्या माध्यमातून मिळणारे, बुद्धी देणारे आणि ऊर्जा वाढवणारे अन्न प्राप्त होवो ही विनंती. उदार सुख देणारी आणि आपल्या दिव्य गुणांनी युक्त असणारी देवी भक्तगणांच्या कल्याणासाठी वेगाने आमच्याकडे येवो ही विनंती.॥१८॥

अभि न इळा यूथस्य माता स्मन्नदीभिरुर्वशी वा गृणातु ।

उर्वशी वा बृहद्दिवा गृणानाभ्यूर्ण्वाना प्रभृथस्यायोः ॥१९॥

गोधनाचे पोषण करणारी माता 'इळादेवी' आम्हा भक्तगणांवर कृपा करो. पवित्र नद्यांसह 'उर्वशी' आमच्या स्तुतीचा स्वीकार करो. ती महान प्रकाशमय आणि दिव्यगुणांनी युक्त असणारी उर्वशी, आमच्या द्वारे भक्तीभावाने अर्पित केलेल्या यज्ञाचा स्वीकार करून, भक्तगणांना आपल्या दैवी प्रकाशाने आणि आनंदाने कृपाशीर्वाद देवो. ॥१९॥

सिषक्तु न ऊर्जव्यस्य पुष्टेः ॥२०॥

आपल्याला अन्न, ऊर्जा आणि समृद्धीची प्राप्ती होवो. ॥२०॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४२

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – विश्वेदेवा १६ रुद्रम **छन्द** त्रिष्टुप् १७ एकपदा विराट्

प्र शंतमा वरुणं दीधिती गीर्मित्रं भगमदितिं नूनमश्याः ।

पृषद्योनिः पञ्चहोता शृणोत्वतूर्तपन्था असुरो मयोभुः॥१॥

आमची अत्यंत सुख आणि शांतता देणारी स्तुतियुक्त प्रार्थना आणि हविष्यान्नाची आहुती वरुण, मित्र, भग आणि अदिती या देवांपर्यंत निश्चितपणे पोहोचो. तसेच, ज्यांचे स्थान अंतराळात आहे, जे पाच प्राणांचे चालक आहेत, ज्यांचा मार्ग कधीही अडवला जाऊ शकत नाही आणि जे जीवन देणारे व सुख उत्पन्न करणारे आहेत असे वायुदेव आमची ही प्रार्थना श्रवण करोत ही विनंती॥१॥

पाच प्राण प्राण, अपान, समान, उदान आणि व्यान.

प्रति मे स्तोममदितिर्जगृभ्यात्सूनुं न माता हृद्यं सुशेवम् ।

ब्रह्म प्रियं देवहितं यदस्त्यहं मित्रे वरुणे यन्मयोभु॥२॥

ज्याप्रमाणे एक माता आपल्या अत्यंत प्रिय आणि सुख देणाऱ्या पुत्राला प्रेमाने जवळ घेते त्याप्रमाणे अदितीदेवींनी आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांची ही हृदयस्पर्शी आणि अत्यंत दिलासा देणारी स्तोत्रे स्वीकारावीत ही विनंती. देवांचे हित करणाऱ्या आम्हा भक्तगणांचे

अर्पण केलेले स्तुतियुक्त स्तोत्र मित्रदेवांना आणि वरुणदेवांना परम सुख व आनंद देणारे ठरोत.॥२॥

उदीरय कवितमं कवीनामुनत्तैनमभि मध्वा घृतेन ।

स नो वसूनि प्रयता हितानि चन्द्राणि देवः सविता सुवाति ॥३॥

हे यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुम्ही भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञान असलेल्या देवांना मधुर वाणीने आणि घृताने तृप्त करावे ही विनंती. प्रकाशमान सवितादेव आम्हांला शुद्ध, अत्यंत कल्याणकारी, मनाला अत्यंत आल्हाद देणारे ऐश्वर्य प्रदान करोत ही विनंती.॥३॥

समिन्द्र णो मनसा नेषि गोभिः सं सूरिभिर्हरिवः सं स्वस्ति ।

सं ब्रह्मणा देवहितं यदस्ति सं देवानां सुमत्या यज्ञियानाम्॥४॥

हे इंद्रदेवा !आपण आम्हांला प्रसन्न व शुद्ध मनाच्या गोधनाचा आशीर्वाद, तसेच ज्ञानी-विद्वान पुरुषांची उत्तम संगत मिळवून द्यावी ही विनंती. हे हरी नावाच्या अश्वाचे स्वामी, इंद्रदेवा ! आपल्याला प्रिय असणारे ज्ञान आणि सर्व पूजनीय देवतांच्या परम कृपादृष्टी आम्हा भक्तगणांना प्रदान करावी ही विनंती.॥४॥

देवो भगः सविता रायो अंश इन्द्रो वृत्रस्य संजितो धनानाम् ।

ऋभुक्षा वाज उत वा पुरंधिरवन्तु नो अमृतासस्तुरासः॥५॥

ऐश्वर्य प्रदान करणारे भगदेव, सर्वांना प्रेरणा देणारे सवितादेव, संपत्तीचा भाग देणारे आणि वृत्रासुराला जिंकून सर्व धनावर विजय मिळवणारे परम पराक्रमी इंद्रदेव, तसेच ऋभूंचे स्वामी ऋभुक्षा, अन्न आणि शक्ती देणारे वाजदेव आणि प्रज्ञा-समृद्धीची देवी पुरंधि, हे सर्व अत्यंत वेगवान आणि अमर असणारे देव आम्हा यज्ञकर्त्या भक्तगणांचे रक्षण करोत आणि आम्हाला समृद्धी देवोत ही विनंती.॥५॥

मरुत्वतो अप्रतीतस्य जिष्णोरजूर्यतः प्र ब्रवामा कृतानि ।
न ते पूर्वे मघवन्नापरासो न वीर्यं नूतनः कश्चनाप॥६॥

मरुद्गणांचे स्वामी, अद्वितीय, सदैव विजयी आणि कधीही वृद्ध न होणाऱ्या इंद्रदेवाच्या महान पराक्रमाचे आम्ही भक्तगण गुणगान करत आहोत. हे ऐश्वर्यशाली इंद्रदेवा !आपल्या पराक्रमाची आणि शक्तीची बरोबरी न पूर्वी कोणी करू शकले, न भविष्यात कोणी करू शकेल, आणि सध्याच्या काळातीलही कोणीही आपल्या शौर्याच्या पार पोहोचू शकणार नाही.॥६॥

उप स्तुहि प्रथमं रत्नधेयं बृहस्पतिं सनितारं धनानाम् ।
यः शंसते स्तुवते शम्भविष्ठः पुरूवसुरागमज्जोहुवानम्॥७॥

हे भक्तगणांनो ! सर्वश्रेष्ठ, ऐश्वर्याचे दाते आणि सुख-समृद्धी धारण करणाऱ्या बृहस्पतींची मनापासून स्तुती करावी . अनंत ऐश्वर्य

असलेले बृहस्पती वारंवार आवाहन करणाऱ्या भक्तगणांची स्तुती ऐकून अत्यंत सुख, प्रचंड संपत्ती प्रदान करतात.॥७॥

तवोतिभिः सचमाना अरिष्टा बृहस्पते मघवानः सुवीराः ।

ये अश्वदा उत वा सन्ति गोदा ये वस्त्रदाः सुभगास्तेषु रायः॥८॥

हे बृहस्पती देवा ! आपल्या रक्षणाने दानशूर भक्तगण नेहमी संकटांपासून मुक्त आणि पराक्रमी पुत्रांचे धनी होतात . जे भक्तगण अश्व ,गायी, वस्त्रे दान करतात, त्या भाग्यवान भक्तगणांना आपल्या श्रेष्ठ धनाची प्राप्ती होते.॥८॥

विसर्माणं कृणुहि वित्तमेषां ये भुञ्जते अपृणन्तो न उक्थैः ।

अपव्रतान्प्रसवे वावृधानान्ब्रह्मद्विषः सूर्याद्यावयस्व ॥९॥

"हे बृहस्पतीदेवा! जे लोक सत्कर्म करत नाहीत, गरजूंना काहीही दान न देता संपत्तीचा एकटेच उपभोग घेतात, अशा स्वार्थी लोकांचे आपण धन नष्ट करावे ही विनंती. व्रतांचे पालन न करता केवळ स्वतःचे ऐश्वर्य आणि संतती वाढवणाऱ्या, सत्याचा द्वेष करणाऱ्या दुष्टांना सूर्यदेवांच्या दिव्य प्रकाशापासून दूर ठेवावे ही विनंती.॥९॥

य ओहते रक्षसो देववीतावचक्रेभिस्तं मरुतो नि यात ।

यो वः शमीं शशमानस्य निन्दात्तुच्छ्यान्कामान्करते सिष्विदानः॥१०॥

हे मरुद्गणांनो ! जो माणूस देवांच्या पवित्र यज्ञकार्यात राक्षसी प्रवृत्तींना आमंत्रित करतो, त्याला आपण चाके नसलेल्या रथाने अंधकारात फेकून देऊन नष्ट करावे ही विनंती. जे आपली मनापासून स्तुती करणाऱ्या भक्ताच्या पवित्र कर्माची निंदा करतात आणि स्वतः चुकीच्या मार्गाने अत्यंत तुच्छ आणि व्यर्थ इच्छा पूर्ण करण्यात मग्न असतात , अशा दुष्टाचा आपण पराभव करावा ही विनंती.॥१०॥

तमु ष्टुहि यः स्विषुः सुधन्वा यो विश्वस्य क्षयति भेषजस्य ।
यक्ष्वा महे सौमनसाय रुद्रं नमोभिर्देवमसुरं दुवस्य ॥११॥

हे भक्तगणांनो ! तुम्ही, उत्कृष्ट धनुर्धारी, सर्व प्रकारच्या औषधांचे स्वामी असलेल्या, दिव्य व अत्यंत शक्तिशाली रुद्रदेवांची मानसिक शांतीसाठी, मनोभावे नतमस्तक होऊन सेवा करावी.॥११॥

दमूनसो अपसो ये सुहस्ता वृष्णः पत्नीर्नद्यो विभ्वतष्टाः ।
सरस्वती बृहद्दिवोत राका दशस्यन्तीर्वरिवस्यन्तु शुभ्राः॥१२॥

शांत मनाने, उत्तम कर्म करणारे ऋभूदेव , समृद्धीची पर्जन्यवृष्टी करणाऱ्या इंद्रदेवांची पत्नीरूपातील नदी, महान दिव्य प्रकाशाने युक्त अशी सरस्वतीदेवी आणि इच्छा पूर्ण करणारी पवित्र राकादेवी या सर्व मनोरथ पूर्ण करणाऱ्या शक्ती आम्हा भक्तगणांवर प्रसन्न होऊन सुख, समृद्धी आणि धन-धान्य प्रदान करोत॥१२॥

प्र सू महे सुशरणाय मेधां गिरं भरे नव्यसीं जायमानाम् ।

य आहना दुहितुर्वक्षणासु रूपा मिनानो अकृणोदिदं नः॥१३॥

उत्तम आश्रय देणाऱ्या महान इंद्रादेवांना आम्ही यज्ञकर्ते भक्तगण बुद्धिमत्तापूर्ण आणि नित्य-नूतन अशी स्तुतियुक्त स्तोत्रे अर्पण करतो. पर्जन्यवृष्टी करणाऱ्या इंद्रदेवांनी कन्येसारख्या असणाऱ्या नद्यांच्या पात्रांना सुंदर आकार दिला आणि आम्हा भक्तगणांच्या उपयोगासाठी हे जीवनदायी जल निर्माण केले.॥१३॥

प्र सुष्टुतिः स्तनयन्तं रुवन्तमिळस्पतिं जरितर्नूनमश्याः ।

यो अब्दिमाँ उदनिमाँ इयर्ति प्र विद्युता रोदसी उक्षमाणः॥१४॥

हे स्तुती करणाऱ्या यज्ञकर्त्या भक्तगणांनो ! तुमची ही उत्तम आणि पवित्र प्रार्थना निश्चितपणे त्या गर्जना करणाऱ्या, विजेचा कडकडाट करणाऱ्या आणि जलाचे स्वामी असलेल्या पर्जन्यदेवांपर्यंत पोहोचावी. ते देव आकाशातील पाण्याचे ढग गतिमान करतात आणि आपल्या विजेद्वारे आकाश व पृथ्वीला पावसाच्या पाण्याने ओले चिंब करतात ॥१४॥

एष स्तोमो मारुतं शर्धो अच्छा रुद्रस्य सूनूँर्युवन्यूँरुदश्याः ।

कामो राये हवते मा स्वस्त्युप स्तुहि पृषदश्वाँ अयासः॥१५॥

आम्हा भक्तगणांचे हे स्तुतियुक्त स्तोत्र रुद्रदेवांचे तरुण आणि पराक्रमी पुत्र असलेल्या मरुद्गणांच्या सामर्थ्यापर्यंत पोहोचो. हे भक्तगणांनो !

समृद्धी आणि धनाची इच्छा करणाऱ्या कल्याणाच्या मार्गाकडे प्रेरित करणाऱ्या स्तोत्रांनी, ठिपके असलेल्या (चित्तीदार) हरणे वाहन असलेल्या मरुद्गणांची, तुम्ही स्तुती करावी॥१५॥

प्रैष स्तोमः पृथिवीमन्तरिक्षं वनस्पतीँरोषधी राये अश्याः ।
देवोदेवः सुहवो भूतु मह्यं मा नो माता पृथिवी दुर्मतौ धात्॥१६॥

आम्हा भक्तगणांची स्तुतियुक्त स्तोत्रे पृथ्वी, अंतरिक्ष, वनस्पती आणि औषधी पर्यंत पोहोचवा आणि त्यांच्या कृपेने आम्हाला उत्तम ऐश्वर्य, अन्न व समृद्धी प्राप्त होवो . सर्व देव आम्हा भक्तगणांना सहजपणे मदत करणारे होवोत. धरणीमाता आम्हाला कधीही दुर्मती न देता आम्हाला सन्मार्गावर ठेवो.॥१६॥

उरौ देवा अनिबाधे स्याम ॥१७॥

हे देवांनो ! आपण प्रदान केलेला महान आनंद आम्हाला कोणत्याही अडथळ्याशिवाय उपभोगता येऊ दे ही विनंती॥१७॥

समश्विनोरवसा नूतनेन मयोभुवा सुप्रणीती गमेम ।
आ नो रयिं वहतमोत वीराना विश्वान्यमृता सौभगानि ॥१८॥

हे अमर अश्विनीकुमारांनो! सुखदायक, नित्यनूतन रक्षण आणि उत्तम मार्गावर जाण्यासाठी आपले मार्गदर्शन आम्हाला प्राप्त होवो ही विनंती. आपण आम्हाला धन-धान्य, ऐश्वर्य आणि पराक्रमी संतती आणि सौभाग्य प्रदान करावे ही विनंती॥१८॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४३

ऋषि- - अत्रि भौम **देवता** – विश्वेदेवा **छन्द** त्रिष्टुप् १६ एकपदा विराट्

आ धेनवः पयसा तूर्ण्यर्था अमर्धन्तीरुप नो यन्तु मध्वा ।

महो राये बृहतीः सप्त विप्रो मयोभुवो जरिता जोहवीति॥१॥

तीव्र गतीने येणाऱ्या, कोणत्याही हिंसेशिवाय आणि मधुर दुधाने समृद्ध असलेल्या गायी (नद्या) आम्हा भक्तगणांच्या समीप येवोत. महान ऐश्वर्याच्या प्राप्तीसाठी, ज्ञानी आणि स्तुती करणारे भक्तगण त्या सुख देणाऱ्या सात नद्यांचे वारंवार आवाहन करत आहेत ॥१॥

सप्त नद्या : सिंधू, वितस्ता (झेलम) असिक्नी (चेनाब) परुष्णी (रावी), विपाश (बियास) शतुद्रि (सतलज), सरस्वती (आता लुप्त झालेली नदी)॥१॥

आ सुष्टुती नमसा वर्तयध्यै द्यावा वाजाय पृथिवी अमृध्रे ।

पिता माता मधुवचाः सुहस्ता भरेभरे नो यशसावविष्टाम्॥२॥

अन्नाची आणि बळाची प्राप्ती करून घेण्यासाठी, आम्ही भक्तगण उत्तम स्तुती आणि आदरयुक्त नमस्कारांद्वारे कधीही क्षीण न होणाऱ्या आकाश आणि पृथ्वीला प्रसन्न करण्याची इच्छा करतो. आमचे माता आणि पिता असणारे, मंगल आशीर्वाद देणारे आणि अत्यंत

कल्याणकारी हात असलेले आकाश आणि पृथ्वी प्रत्येक कार्यात (संकटात) यशासह आमचे रक्षण करोत॥२॥

अध्वर्यवश्चकृवांसो मधूनि प्र वायवे भरत चारु शुक्रम् ।

होतेव नः प्रथमः पाह्यस्य देव मध्वो ररिमा ते मदाय ॥३॥

हे अध्वर्यु यज्ञकर्त्यांनो! तुम्ही तयार केलेला हा अत्यंत प्रिय, गोड आणि शुद्ध सोमरस वायुदेवांना अर्पण करावा . हे वायुदेवा ! आपण आमच्या यज्ञातील मुख्य 'होता' बनून सर्वात आधी या मधुर रसाचे प्राशन करावे ही विनंती. आपल्या आनंदासाठी आम्ही हा सोमरस अर्पण केला आहे.॥३॥

दश क्षिपो युञ्जते बाहू अद्रिं सोमस्य या शमितारा सुहस्ता ।

मध्वो रसं सुगभस्तिर्गिरिष्ठां चनिश्चदद्दुदुहे शुक्रमंशुः॥४॥

यज्ञामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या, अत्यंत कुशल भक्तगणांच्या दोन्ही बाहूंची दहा बोटे पाषाणाशी जोडले जातात आणि सोमरस सिद्ध करण्याच्या कामात व्यस्त होतात. अत्यंत कुशल बोटांचा भक्त , पर्वतावर उत्पन्न झालेल्या आल्हाददायक मधुर सोमाच्या वेलींमधून शुद्ध व निर्मळ सोमरस अशा प्रकारे सिद्ध करतो, जणू काही तो दुभत्या गायीचे दूधच काढत आहे॥४॥

असावि ते जुजुषाणाय सोमः क्रत्वे दक्षाय बृहते मदाय ।

हरी रथे सुधुरा योगे अर्वागिन्द्र प्रिया कृणुहि हूयमानः॥५॥

हे इंद्रदेवा ! आपल्या महान कर्मासाठी, आनंदासाठी, सामर्थ्यासाठी हा सोमरस सिद्ध केला आहे. आम्ही भक्तगण जेव्हा आपले आवाहन करतो तेव्हा आपण आपल्या उत्तम रथाला अश्व जुंपून तो रथ आमच्या यज्ञस्थळी घेऊन यावा ही विनंती.॥५॥

आ नो महीमरमतिं सजोषा ग्नां देवीं नमसा रातहव्याम् ।

मधोर्मदाय बृहतीमृतज्ञामाग्ने वह पथिभिर्देवयानैः ॥६॥

हे अग्निदेवा ! आपण आमच्यावर प्रसन्न होऊन, देवांच्या दिव्यमार्गांनी त्या महान अरमतीदेवींना आमच्या यज्ञस्थळी येथे घेऊन यावे. अंतिम सत्य जाणणाऱ्या, दिव्य अरमतीदेवींना आम्ही भक्तगण आहुती अर्पण करत असलेल्या यज्ञामध्ये या मधुर सोमरस प्राशन करण्याच आनंद स्वीकारण्यासाठी यावे ही विनंती. ॥६॥

(अरमतीदेवी: भक्ती व सद्बुद्धीची अधिष्ठात्री)

अञ्जन्ति यं प्रथयन्तो न विप्रा वपावन्तं नाग्निना तपन्तः ।

पितुर्न पुत्र उपसि प्रेष्ठ आ घर्मो अग्निमृतयन्नसादि॥७॥

जेव्हा बुद्धिमान यज्ञकर्ते भक्तगण यज्ञाला परिपूर्ण करतात. ज्या वेळी हविष्यान्नाची आहुती अग्नी द्वारा तप्त होते त्यावेळी यज्ञकुंड अग्रीला अशा प्रकारे धारण करतो जणू काही पित्याने आपल्या प्रिय पुत्राला आपल्या मांडीवर बसवले आहे.॥७॥

अच्छा मही बृहती शंतमा गीर्दूतो न गन्त्वश्विना हुवध्यै ।

मयोभुवा सरथा यातमर्वाग्गन्तं निधिं धुरमाणिर्न नाभिम्॥८॥

आम्हा भक्तगणांची अत्यंत सुख देणारी स्तुतियुक्त स्तोत्रे अश्विनीकुमारांचे आवाहन करण्यासाठी एखाद्या दूताप्रमाणे सरळ त्यांच्याकडे जावोत . हे अश्विनीकुमारांनो ! ज्याप्रमाणे रथाच्या चाकाच्या मध्यवर्ती नाभीला एखादा खिळा घट्टपणे धरून ठेवतो, त्याप्रमाणे आपल्या रथाला घट्टपणे पकडून आणि रथावर विराजमान होऊन आपण यज्ञामध्ये साठवलेल्या सोमरसाचा स्वीकार करावा ही विनंती.॥८॥

प्र तव्यसो नमउक्तिं तुरस्याहं पूष्ण उत वायोरदिक्षि ।

या राधसा चोदितारा मतीनां या वाजस्य द्रविणोदा उत त्मन्॥९॥

आम्ही यज्ञकर्ते भक्तगण शक्तिशाली आणि वेगवान पूषन् देवांची आणि वायुदेवांची, नतमस्तक होऊन स्तुती करतो. हे दोन्ही देव ! आपण भक्तगणांना बुद्धीला प्रेरणा, सामर्थ्य अन्न आणि ऐश्वर्य प्रदान करणारे आहात .॥९॥

आ नामभिर्मरुतो वक्षि विश्वाना रूपेभिर्जातवेदो हुवानः ।

यज्ञं गिरो जरितुः सुष्टुतिं च विश्वे गन्त मरुतो विश्व ऊती ॥१०॥

हे सर्वांचे ज्ञान असणाऱ्या जातवेदा अग्निदेवा! आमच्या आवाहनाने आपण, वेगवेगळ्या नावांनी आणि रूपांनी प्रसिद्ध असलेल्या सर्व

मरुद्गणांना यज्ञस्थळी घेऊन यावे . हे मरुद्गणांनो ! आपण स्तुती करणाऱ्या भक्ताच्या यज्ञाचा, स्तुतियुक्त स्तोत्रांचा स्वीकार करण्यासाठी आपल्या सर्व रक्षण साधनांसह आगमन करावे ही विनंती॥१०॥

आ नो दिवो बृहतः पर्वतादा सरस्वती यजता गन्तु यज्ञम् ।
हवं देवी जुजुषाणा घृताची शग्मां नो वाचमुशती शृणोतु॥११॥

विशाल स्वर्गातून आणि मोठ्या पर्वतावरून येणाऱ्या, पूजनीय, हे देवीसरस्वती ! आपण आमच्या यज्ञस्थळी यावे ही विनंती. आमच्या आवाहनाचा आनंदाने स्वीकार करणारी, घृताने समृद्ध आणि आमच्यावर प्रेम करणाऱ्या हे देवीसरस्वती ! आपण आमच्या, स्तुतियुक्त स्तोत्रांचे श्रवण करावे ही विनंती.॥११॥

आ वेधसं नीलपृष्ठं बृहन्तं बृहस्पतिं सदने सादयध्वम् ।
सादद्योनिं दम आ दीदिवांसं हिरण्यवर्णमरुषं सपेम॥१२॥

हे यज्ञकर्त्यांनो !अत्यंत ज्ञानी, विस्तीर्ण, निळ्या आकाशासारखी आभा असणाऱ्या, महान बृहस्पतींना, तुम्ही तुमच्या यज्ञवेदीमध्ये स्थापित करावे . आपल्या यज्ञगृहात अत्यंत तेजस्वीपणे प्रदीप्त होणाऱ्या, सोनेरीकांती असणाऱ्या, आपल्या योग्य आसनावर विराजमान झालेल्या बृहस्पतीदेवांची आम्ही भक्तगण मनोभावे पूजा करतो.॥१२॥

आ धर्णसिर्बृहद्दिवो रराणो विश्वेभिर्गन्त्वोमभिर्हुवानः ।
ग्ना वसान ओषधीरमृध्रस्त्रिधातुशृङ्गो वृषभो वयोधाः॥१३॥

सर्व विश्वाचे पालनकर्ते, परमतेजस्वी, इच्छा पूर्णकरणारे, सर्व संरक्षक साधनांनी युक्त, ज्वाळा आणि औषधे प्रदान करणारे , अखंड गती असलेले , ज्ञान-शक्ती-धन असे तिहेरी सामर्थ्य असलेले, वृष्टी करणारे, उत्कृष्ट जीवन व ऊर्जा प्रदान करणारे अग्निदेव आम्हा भक्तगणांच्या यज्ञस्थळी येवोत ही विनंती. ॥१३॥

मातुष्पदे परमे शुक्र आयोर्विपन्यवो रास्पिरासो अग्मन् ।
सुशेव्यं नमसा रातहव्याः शिशुं मृजन्त्यायवो न वासे॥१४॥

सर्वांचे कल्याण इच्छिणारे, मंत्रांचा उच्चार करणारे , मोठ्या उत्साहाने स्तुतियुक्त स्तोत्रे पठण करणारे यज्ञकर्ते भक्तगण धरणीमातेच्या अत्यंत पवित्र आणि दैदिप्यमान अशा सर्वोच्च स्थानावर, यज्ञवेदीवर, एकत्र आले आहेत. ज्याप्रमाणे लहान बाळाला प्रेमाने कुरवाळतात, स्वच्छ करतात आणि त्याची काळजी घेतात त्याप्रमाणे हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे भक्तगण नतमस्तक होऊन नुकत्याच प्रदीप्त झालेल्या शिशुअग्निदेवांची शुश्रूषा करत आहेत. ॥१४॥

बृहद्भयो बृहते तुभ्यमग्ने धियाजुरो मिथुनासः सचन्त ।
देवोदेवः सुहवो भूतु मह्यं मा नो माता पृथिवी दुर्मतौ धात्॥१५॥

हे शक्तिशाली अग्निदेवा! शुद्धबुद्धीने आणि प्रचुर प्रमाणात हविष्यान्नाची आहुती अर्पण करणारे यज्ञकर्ते पती-पत्नीचे जोडपे आपली आराधना करत आहे. प्रत्येक देव आम्हा भक्तगणांच्या हाकेला ओ देणारे असोत. धरणीमाता आम्हा भक्तगणांना कधीही वाईट विचारांत न ढकलता सदैव सद्बुद्धी देवो ही विनंती॥१५॥

उरौ देवा अनिबाधे स्याम॥१६॥

हे देवांनो ! आपण प्रदान केलेला महान आनंद आम्हाला कोणत्याही अडथळ्याशिवाय उपभोगता येऊ दे ही विनंती॥१६॥

समश्विनोरवसा नूतनेन मयोभुवा सुप्रणीती गमेम ।

आ नो रयिं वहतमोत वीराना विश्वान्यमृता सौभगानि ॥१७ ॥

हे अमर अश्विनीकुमारांनो! सुखदायक, नित्यनूतन रक्षण आणि उत्तम मार्गावर जाण्यासाठी आपले मार्गदर्शन आम्हाल प्राप्त होवो ही विनंती. आपण आम्हाला धन-धान्य, ऐश्वर्य आणि पराक्रमी संतती आणि सौभाग्य प्रदान करावे ही विनंती॥१७॥

।। अथ पञ्चमं मण्डलम् ।।

सूक्त-४४

ऋषि- अवत्सार काश्यप **देवता** – विश्वेदेवा **छन्द** जगती; १४, १५ त्रिष्टुप्

तं प्रत्नथा पूर्वथा विश्वथेमथा ज्येष्ठतातिं बर्हिषदं स्वर्विदम् ।
प्रतीचीनं वृजनं दोहसे गिराशुं जयन्तमनु यासु वर्धसे॥१॥

ज्याप्रमाणे प्राचीन ऋषींनी, आपल्या पूर्वजांनी, आणि आजच्या वर्तमानकाळातील भक्तगणांनी त्या परमेश्वराची स्तुती करून आपले मनोरथ पूर्ण केले आहेत, त्याप्रमाणे हे मानवा ! तू सुद्धा आपल्या पवित्र वाणीने त्या परमेश्वराची उपासना कर, जो सर्वश्रेष्ठ आहे, यज्ञवेदीवर विराजमान आहे, दिव्य ज्ञानी आहे, जो अत्यंत वेगवान आणि नेहमी विजयी होणारा आहे. परमेश्वराच्या केवळ स्तुतीनेच तू जीवनात समृद्धी आणि प्रगती प्राप्त केली पाहिजे. ॥१॥

श्रिये सुदृशीरुपरस्य याः स्वर्विरोचमानः ककुभामचोदते ।
सुगोपा असि न दभाय सुक्रतो परो मायाभिऋृत आस नाम ते॥२॥

हे स्वर्गात दिव्यप्रकाश देणाऱ्या इंद्रदेवा ! आपण सर्व जीवांच्या कल्याणासाठी मेघांमधील सुंदर जल सर्व दिशांना पसरवावे ही विनंती. हे श्रेष्ठ कर्म करणाऱ्या, रक्षणकर्त्या इंद्रदेवा! आपण सर्व मायावी

शक्तींच्या पलीकडे असल्याने आपले नाव अंतिम सत्यामध्ये आदराने घेतले जाते.॥२॥

अत्यं हविः सचते सच्च धातु चारिष्टगातुः स होता सहोभरिः ।
प्रसर्स्राणो अनु बर्हिर्वृषा शिशुर्मध्ये युवाजरो विस्रुहा हितः॥३॥

वेगवान, बलवान अग्निदेव यज्ञात अर्पण केल्या जाणाऱ्या आहुतींचा स्वीकार करतात. विघ्न नसलेल्या मार्गावरून गमन करणारे अग्निदेव, मुख्य यज्ञकर्ते असून प्रचंड शक्ती प्रदान करणारे आहेत. कुशासनावर विराजमान होणारे, सुखाचा वर्षाव करणारे, कधीही वृद्ध न होणारे, सदैव तरुण, लहान बालकासारखे असलेले अग्निदेव वनस्पतींमध्ये निवास करतात .॥३॥

प्र व एते सुयुजो यामन्निष्टये नीचीरमुष्मै यम्य ऋतावृधः ।
सुयन्तुभिः सर्वशासैरभीशुभिः क्रिविर्नामानि प्रवणे मुषायति॥४॥

निसर्गाच्या नियमांचे पालन करणाऱ्या, सूर्यदेवांची किरणे इच्छित कल्याणा करण्याकरता खालच्या दिशेने पृथ्वीकडे जात आहेत. सर्वांवर शासन करणाऱ्या आणि योग्य नियंत्रण ठेवणाऱ्या आपल्या किरणांच्या सहाय्याने सूर्यदेव (क्रिवि) सखल भागातील जल शोषून घेतात॥४॥

(सुयुजःउत्तम प्रकारे जोडलेले. रथाला घोडे जोडलेले असतात, त्याप्रमाणे सूर्यदेवांची किरणे असतात)

संजर्भुराणस्तरुभिः सुतेगृभं वयाकिनं चित्तगर्भासु सुस्वरुः ।
धारवाकेष्वृजुगाथ शोभसे वर्धस्व पत्नीरभि जीवो अध्वरे॥५॥

हे योग्य पद्धतीने स्तुती करणाऱ्या (ऋजुगाथ) अग्निदेवा ! जेव्हा आपण लाकडी पात्रांद्वारे (तरुभिः) पवित्र सोमरस ग्रहण करता, तेव्हा आपण उत्साहाने स्वतःला प्रकट करता. विद्वान साधकांच्या हृदय गुहेत प्रस्थापित होऊन तुम्ही शोभून दिसता. हे जीवन देणाऱ्या या पवित्र यज्ञामध्ये आपण चारी बाजूंनी वृद्धिंगत होऊन संरक्षक शक्तींना समृद्ध करावे ही विनंती.॥५॥

यादृगेव ददृशे तादृगुच्यते सं छायया दधिरे सिध्रयाप्स्वा ।
महीमस्मभ्यमुरुषामुरु ज्रयो बृहत्सुवीरमनपच्युतं सहः॥६॥

देवता ज्या स्वरूपात भक्तगणांना दर्शन देतात त्या रूपाचेच वर्णन केले जाते. देव आपल्या तेजासह जलामध्ये निवास करतात. हे देवतांनो ! आम्हा भक्तगणांना महान, अथांग सामर्थ्य, उत्तम वीरपुत्रांनी युक्त असलेले आणि कधीही नष्ट न होणारे अक्षय बल प्रदान करावे ही विनंती.॥६॥

वेत्यग्रुर्जनिवान्वा अति स्पृधः समर्यता मनसा सूर्यः कविः ।
घ्रंसं रक्षन्तं परि विश्वतो गयमस्माकं शर्म वनवत्स्वावसुः॥७॥

आपल्या पत्नीबरोबर (उषा देवतेबरोबर) नेहमी पुढे जाणारे, स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा नाश करणारे, उत्साही, भूत, वर्तमान आणि भविष्य काळाचे ज्ञानी सूर्यदेव पुढे जाण्याची इच्छा बाळगतात. अथांग ऐश्वर्याचे स्वामी सूर्यदेव आम्हा भक्तगणांना प्रखर उन्हापासून(कठीण संकटापासून) रक्षण करण्याकरता एक उज्वल, सुरक्षित घर आणि परिपूर्ण सुख प्रदान करोत ही विनंती.॥७॥

ज्यायांसमस्य यतुनस्य केतुन ऋषिस्वरं चरति यासु नाम ते ।
यादृश्मिन्धायि तमपस्यया विदद्य उ स्वयं वहते सो अरं करत्॥८॥

हे गतिमान सूर्यदेवा ! यज्ञकर्ते भक्तगण,ज्यामध्ये आपले नव रूप सामावले आहे , ज्यामुळे आपल्याला प्रसिद्धी मिळते, ज्यामध्ये त्यांचे चित्त जोडलेले असते, अशा स्तुतियुक्त स्तोत्रांचे पठण करतात, ते अत्यंत श्रेष्ठ ऋषींचा उपदेश मिळवतात आणि त्यांचे जीवन सुखी होते.॥८॥

समुद्रमासामव तस्थे अग्रिमा न रिष्यति सवनं यस्मिन्नायता ।
अत्रा न हार्दि क्रवणस्य रेजते यत्रा मतिर्विद्यते पूतबन्धनी ॥९॥

जी दैवीशक्ती समुद्रात जाऊन स्थिरावते, ती दैवीशक्ती ज्या यज्ञामध्ये विस्तारते त्या यज्ञातील उपासना कधीही नष्ट होत नाही. दैवीशक्ती ज्या यज्ञकर्त्या भक्तगणांच्या पवित्र बंधनांनी युक्त असलेल्या बुद्धीमध्ये निवास करते, त्या स्तुती करणाऱ्या भक्तगणांचे हृदय कधीही डगमगत नाही.॥९॥

स हि क्षत्रस्य मनसस्य चित्तिभिरेवावदस्य यजतस्य सध्रेः ।

अवत्सारस्य स्पृणवाम रण्वभिः शविष्ठं वाजं विदुषा चिदर्ध्यम्॥१०॥

परमात्मा आपल्या क्षात्रतेजाने (क्षत्रस्य:) आणि श्रेष्ठ विचाराने (मनसस्य चित्तिभि:) भरलेला आहे. यज्ञास पात्र असलेल्या आणि योग्य मार्गावर चालणाऱ्या अवत्सार ऋषींच्या आनंददायी स्तुतींनी आम्ही भक्तगण परमात्म्याची प्रार्थना करतो. विद्वानांना मिळवण्यास योग्य असलेले शक्तिशाली बल आणि समृद्धी आम्हा भक्तगणांना प्राप्त व्हावी .॥१०॥

श्येन आसामदितिः कक्ष्यो मदो विश्ववारस्य यजतस्य मायिनः ।

समन्यमन्यमर्थयन्त्येतवे विदुर्विषाणं परिपानमन्ति ते ॥११॥

सोमरसामुळे निर्माण झालेला आनंद, मन पूर्णपणे भरणारा, श्येनपक्ष्या प्रमाणे सर्वत्र संचार करणारा आणि हा अदितीप्रमाणे सर्वव्यापी आहे. या सोमरसाला विश्ववार, यजात आणि माया या ऋषींचा आशीर्वाद लाभलेला आहे. ते सर्व सोमरस प्राशन करून आनंदित आणि समृद्ध होण्याची इच्छा बाळगतात.॥११॥

सदापृणो यजतो वि द्विषो वधीद्बाहुवृक्तः श्रुतवित्तर्यो वः सचा ।

उभा स वरा प्रत्येति भाति च यदीं गणं भजते सुप्रयावभिः॥१२॥

जे देवतांची सर्वोत्तम स्तुती करतात ते सदापृण , यजत, बाहुवृक्त, श्रुतचित आणि तार्य ऋषी सर्व मिळून आपल्या शत्रूंचा नाश करतात.

ते सर्व ऋषी या जगातील देवतांची विशेष स्तुती करत असल्यामुळे, या जगाच्या आणि परलोकाच्या दोन्ही इच्छा पूर्ण करून तेजोमय होवोत.॥१२॥

सुतम्भरो यजमानस्य सत्पतिर्विश्वासामूधः स धियामुदञ्चनः ।
भरद्धेनू रसवच्छिश्रिये पयोऽनुब्रुवाणो अध्येति न स्वपन्॥१३॥

यज्ञाचे दायित्व सांभाळणारे (सुतम्भरः) आणि सज्जनांचे रक्षण करणारे (सत्पतिः) देव यज्ञकर्त्या भक्तगणांचे पाठीराखे आहेत . ते संपूर्ण सृष्टीच्या समृद्धीचा मुख्य आधार असून, मानवाच्या बुद्धीला प्रगतीपथावर नेतात (उदञ्चनः) . ते गायींचे पोषण करतात आणि त्यांच्यामध्ये मधुर, पौष्टिक दूध निर्माण करतात. असे हे देव चिंतन करत,आळस न करता ज्ञानाचा प्रकाश पसरवतात॥१३॥

यो जागार तमृचः कामयन्ते यो जागार तमु सामानि यन्ति ।
यो जागार तमयं सोम आह तवाहमस्मि सख्ये न्योकाः॥१४॥

जो भक्तगण सतत जागृत राहतो, त्यालाच वेदांमधील ज्ञान शोधता येते, त्याच्याकडे शांती चालून येते, त्याला ईश्वरीशक्ती प्राप्त होते. त्या जागृत पुरुषाला हा आनंद म्हणतो— 'मी तुझ्या मैत्रीत पूर्णपणे रमलो आहे आणि तुझ्याच घरी सुखाने राहत आहे.'"॥१४॥

ह्या ऋचेत सोम आनंद ह्या अर्थाने वापरला आहे

अग्निर्जागार तमृचः कामयन्तेऽग्निर्जागार तमु सामानि यन्ति ।

अग्निर्जागार तमयं सोम आह तवाहमस्मि सख्ये न्योकाः॥१५ ॥

जो भक्तगण सतत जागृत राहतो ,ऋचा त्याच्या इच्छा पूर्ण करतात. जो जागा राहतो, त्याच्याकडेच शांती आणि सामर्थ्य चालून येतात. त्या जागृत पुरुषाला हा आनंद म्हणतो— 'मी तुझ्या मैत्रीत पूर्णपणे रमलो आहे आणि तुझ्याच घरी सुखाने राहत आहे.'".(१५)

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे एकोणिसावे वर्ष आहे. प्रा श्रीपाद काळे यांचे हे ई साहित्यवरचे सोळावे पुस्तक आहे.

प्रा श्रीपाद काळे हे विज्ञानाचे प्राध्यापक. मुंबईतील विख्यात विल्सन कॉलेजमधे त्यांनी विज्ञान शिकवले. तसेच मुंबईतील स्वा. सावरकर स्मारकामधे विविध उपक्रमांमधे ते कार्यरत आहेत. ऋग्वेद हे त्यांचे पहिलेच प्रकाशित पुस्तक.

प्रा श्रीपाद काळे यांच्यासारखे काही थोडे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६४ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता

देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६४ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), **आसावरी काकडे** (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण(३२)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१९ भूगोल विज्ञान

विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१६)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३), विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'ई'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव Whatsapp करा)





आधीचे मंडल
वाचण्यासाठी
इथे क्लिक करा